# संस्मरणीय विस्मृतांचे

# कृतज्ञ स्मरण

*

दत्तोपंत ठेंगडी

भारतीय विचार साधाना, नागपूर - २

प्रकाशक

**पु. मो. सोनटक्के**

कार्यवाह

**भारतिय विचार साधना,**

डॉ. हेडगेवार भवन, महाल, नागपूर- २

मूल्य ८ रूपये

अक्षर जुळवणी आणि छपाई :

**संजय आर्टस्,**

१२४ रेशीमबाग, नागपूर – ९. फोन नं. ७४६२०९.

# संस्मरणीय विस्मृतांचे

# कृतज्ञ स्मरण

एका घटनेचा उल्लेख मी यापूर्वी केलेला आहे. तथापि या स्वप्नरंजनाच्या संदर्भात पुन्हा एकदा तिचा उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही.

परमपूजनीय श्री गुरुजींच्या शेवटच्या आजारांत मा. श्री बापुराव मोघे एप्रिल महिन्यांत त्यांच्या दर्शनाकरिता दोन दिवस नागपूरला येऊन राहिले होते, तिसऱ्या दिवशी सकाळच्या ग्रँड ट्रंकने ते दिल्लीला जाणार होते. स्टेशनवर जाण्यापूर्वी निरोप घेण्याकरिता ते श्री गुरुजींच्या खोलीत आले व चरणस्पर्श करुन जायला निघाले. गुरुजींनी मामा मुठाळला सांगितले की, फोन वरुन विचारुन घे की जी.टी. वेळेवर आहे की, लेट आहे. व बापुरावना म्हणाले की, निरोप येईपर्यंत दोन मिनिट बसा. गुरुजी खुर्चीवर बसलेले होते.

बापुराव बसल्यानंतर गुरुजींनी त्यांना अचानक अनपेक्षित प्रश्न केला. (संदर्भ विरहित), त्यांनी विचारले "बापूराव तुम्ही हे वाचले आहे काय की, अरविंद जेल मधें असतांना विवेकानंद त्यांना योग शिकविण्यासाठी त्यांच्या जेल मधे येत असत व त्यांना योग शिकवीत असत?" बापुराव म्हणाले, "मी हे वाचले नाही."

यात खूबीची गोष्ट हीं होती की, अरविंद जेल मधे गेले त्यांच्या कांही वर्षे आधीच विवेकानंदांचे महानिर्वाण झाले होते.

बापुराव यांनी "मी हे वाचले नाही," असे म्हटल्यानंतर एखाद मिनिट गुरुजी स्तब्ध राहिले नंतर जणु स्वत:शीच बोलावे अशा रीतीने (Thinking aloud) ते बोलू लागले. "हे असेच आहे. परमेश्वर एखाद्याला काही मिशन देऊन पाठवितो. ते मिशन एका जीवनांत पूर्ण होण्याइतके लहान असले तर गोष्ट निराळी, परंतु मिशन मोठे असेल, एका आयुष्यात पूर्ण होण्यासारखे नसेल व अशा व्यक्तीला मध्येच मृत्यू आला, तर त्याला परमेश्वर मुक्ति प्राप्त करण्याचा अधिकार देत नाही. मोक्ष प्राप्त न करता, जो पर्यंत मिशन पूर्ण होत नाही, तोपर्यंत अशरीरी अवस्थेमधे राहून दिलेल्या कार्याची सुपरविजन करणे, त्याला सहायता करणें, ही जबाबदारी त्याला सांभाळावी लागते. मिशन पूर्ण झाल्यानंतरच त्याला मोक्षाचा अधिकार प्राप्त

होतो".

पूर्वी सांगितल्या प्रमाणे हे बोलणे अचानक व संदर्भ विरहित होते. विवेकानंदांचे उदाहरण देऊन श्री गुरुजी स्वत:विषयींच संकेत करीत होते, हे स्पष्ट होते.

दि. १७ मार्च १९९७ ला मला या संभाषणाची आठवण झाली. कारण त्या दिवशीची घटना.

नागपूरला रेशीमबाग मध्ये प्रांत प्रचारकांची बैठक चालू होती. त्यापूर्वी नागपूर कॉर्पोरेशनच्या निवडणुकीत भाजपाने नेत्रदीपक यश प्राप्त केले होते व भाजपाचा एक तरुण कार्यकर्ता देवेन्द्र फडणवीस नागपूरचा महापौर म्हणून निवडून आला होता. आतापर्यंत झालेल्या सर्व महापौरांपेक्षा कमी वयाचा हा कार्यकर्ता होता. तो संघाचा नियमित स्वयंसेवक होता. त्याचे वडीलही गंगाधरराव फडणवीस बाल्यावस्थेपासून स्वयंसेवक होते व अेम्.ए. ची दोन वर्षे ओरिसांतील कटक येथें संघ योजनेतून व्यतीत करुन, कटकच्या संघकार्याला गती प्रदान केली होती. त्याचा सार्वजनिक सन्मान त्या दिवशी सायंकाळी विशाल सार्वजनिक सभेमध्ये मा. श्री लालकृष्ण अडवाणी यांचे द्वारा झाला होता. तो कार्यक्रम आटोपून अडवाणीजी, महापौर व भाजपाचे स्थानीय व प्रांतीय पुढारी सर्व मिळून रेशीमबागमध्ये आले होते. खाजगी चहापान आटोपल्यावर मा. अडवाणीजींनी सर्व प्रांतप्रचारकां बरोबर अनौप-चारिक रीत्या बसावे असा नियोजित कार्यक्रम होता. त्या प्रसंगी नवनिर्वाचित महापौराचे थोडेसे भाषण झाले. त्यातून त्याचे स्वयंसेवकत्व प्रकट होत होते. त्यानंतर अडवाणीजींचे अतिसंक्षिप्त भाषण झाले. अशा विजयोत्सवाकडे संघाचा खरा स्वयंसेवक असलेल्या राजकीय पक्षाच्या अध्यक्षाने कोणत्या दृष्टीने पहावे, हे त्यांच्या भाषणांतून उत्तम रीतीने प्रकट झाले होते.

एकूण वातावरण आनंदाचे होते. आनंद सर्वांच्याच मनात ओतप्रोत होता. कांहींच्या मनात हर्षोन्मादही होता. आपण यावेळी बाजी मारली, आता यापुढे "यावच्चन्द्र दिवाकरौ" नागपूर नगराचे नेतृत्व आपल्या पक्षाकडेच राहील, असा त्यांचा विश्वास. अर्थात हर्षोन्मादाने बेहोष झालेल्या अशा लोकांची संख्या कमी होती. बाकी सर्वांच्या मनांत सात्विक आनंद होता.

त्यावेळी माझ्या मनांत अचानक अशी कल्पना आली की, हा सोहळा पाहण्याकरिता डॉ. हेडगेवार इथे अशरीरी अवस्थेत उपस्थित आहेत व त्यांनाही या प्रसंगी अतिशय आनंद झाला आहे.

आनंदाचे कारण? यापुढे यावच्चन्द्र दिवाकरौ नागपूर नगर संघाकरितां सुरक्षित झाले आहे. अशा कल्पनेमुळे त्यांना आनंद झाला असेल काय?

हे तर शक्य नाही. सर्वसाधारण अनुभवी नागरिक जे जाणतो त्याची जाणीव प.पू. डॉक्टरांना नसेल, हे कसे शक्य आहे? सर्व अनुभवी लोक जाणतात की, राजकारणांतील यशापयश चिरकालीन असू शकत नाही. जगात असे एकही उदाहरण नाही की, कोणत्याही लोकशाही देशांत एखादा राजकीय पक्ष सतत शे-पाचशे वर्षे सत्तेमधें राहिला आहे. असे घडू शकत नाही. सत्ताधारी पक्ष Periodically बदलत असतात. लिबरल - कॉन्झर्वेटिव्ह - लेबर, कॉन्झर्वेटिव्ह, रिपब्लिकन - डेमोक्रॅटिक-रिपब्लिकन, हे चालत राहते. "यावचन्द्र दिवाकरौ" ही गोष्ट या क्षेत्रात लागू होत नाही. आज यश, उद्या अपयश, परवा पुन्हा यश, त्यानंतर पुन्हा अपयश - असे बदल सारखे होतच असतात. त्यामुळे एका विजयाने एकदम हर्षोन्माद (euphoria) होणे हे बालीशपणाचेच लक्षण आहे.

ही वस्तुस्थिति असतांनाही याप्रसंगी डॉक्टरांना फार आनंद झाला असेल असे का वाटले?

त्यांच्या या आनंदाच्या पार्श्वभूमीत राजकीय संदर्भ नाही. निराळा संदर्भ आहे. मला असे वाटले की, या प्रसंगी डॉक्टरांना दि. २ फेब्रुवारी १९४८ ला याच स्थळी झालेली घटना अवश्य आठवली असेल.

गांधीहत्ये नंतर सत्ताधारी पक्षाने जाणूनबुजून, निर्लज्जपणें संघा-विरुद्ध खोटा प्रचार करुन जनतेला भडकविले होते व सर्व प्रचार माध्यमांचा वापर करुन जनतेची दिशाभूल केली होती. हत्येची घटना घृणास्पद होतीच. त्यामुळे लोकांची माथी भडकली. त्यांनी प.पू. डॉक्टरांच्या समाधीवर व प.पू. गुरुजींच्या घरावर हल्ला केला. त्याप्रसंगी समाधीची कांही तोडमोडही झाली. मतलब हा की, त्याप्रसंगी नागपूरच्या जनमानसाचा लंबक एका चुकीच्या टोकावर (extreme वर) जाऊन पोहचला.

काळाच्या ओघात वस्तुस्थिति जसजशी स्पष्ट होत गेली तसतशी लोकांची मन:स्थितिही निवळत गेली. तथापि सरकारी प्रचाराचा परिणाम जनमानसांत इतका खोलवर गेला होता की, सत्यस्थितीची कल्पना येऊनही पूर्वग्रह मनातून जाणे फार कठीण होते. काही विचारवंत यातून लवकर सावरले. हल्ला करणाऱ्या मंडळीचे त्यावेळी नेतृत्व करणाऱ्या जनरल मंचरशा आवारी सारख्या जहाल पुढाऱ्यांनी पूर्वग्रहाला मूठमाती दिली, व प.पू. श्री गुरुजींच्या घरच्या सायंकालीन प्रार्थनेनंतरच्या खाजगी बैठकीत येऊन बसणे व पूजनीय ताईना चरणस्पर्श करुन वंदन करणें असा उपक्रमही सुरु केला. परंतु अशांची संख्या अति अल्प होती. सर्वसाधारण नागरिकांना संघाचे निर्दोषित्व पटल्यानंतरही पूर्वग्रहाचे पटल मनातून दूर करणे आवश्यक वाटले नव्हते.

या पार्श्वभूमीवर हे ध्यानांत असल्यामुळे डॉक्टरांना आनंद

होणे स्वाभाविक होते की, अगदी चुकीच्या टोकावर गेलेला जनमानसाचा लंबक ४९ वर्षानंतर आता प्रथमच सुवर्णमध्यावर आला आहे. तो आता आहे त्याच बिंदूभर अखंड स्थिर राहील, असे मानणे डॉक्टरांच्या सारख्या मानसशास्त्रज्ञांना शक्यच नव्हते. जनमानस अस्थिर असते. निरनिराळ्या गोष्टींचा त्यावर परिणाम होत असतो. त्यामुळे आज सुवर्णमध्य बिंदूवर आलेला लंबक काळाच्या ओघात, कधी या दिशेने तर कधी उलट दिशेने वाटचाल करीत राहणार हे समजण्या करिता फार बुद्धिमत्तेची आवश्यकता नाही.

परंतु जवळजवळ पाच दशकांच्या दीर्घकालावधी नंतर का होईना हा लंबक प्रथमच सुवर्ण मध्यबिंदूवर आला आहे. ही गोष्ट फार समाधानाची आहे. या नंतर काळाच्या ओघात तो पुन्हा सुवर्णमध्यबिंदूच्या कधी या दिशेने तर कधी त्या दिशेने चुळबुळ करीत राहणार हे खरे असले तरी यावेळी तो या बिंदूवर आला आहे ही फार संतोषदायक घटना आहे, या कल्पनेने डॉक्टरांना एक प्रकारचा सांत्वनायुक्त आनंद अवश्य झाला असणार, असे मला वाटले.

आणि नंतर आपोआपच मनात विचार आला की, अशा सात्विक आनंदाच्या प्रसंगी डॉक्टरांना कुणाकुणाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण झाले असेल ? कारण अशा प्रसंगी श्रेष्ठ पुरुष स्वत: विनम्र होतात व ज्यांच्या ज्यांच्या सहयोगामुळे असा क्षण उपस्थित होऊ शकला अशा सर्व लहानथोर उपकारकर्त्यांचे ह्रदयपूर्वक स्मरण करतात, हा सर्वसाधारण अनुभव आहे.

* * * * *

आजच्या परिस्थितींत हा विषय फार औचित्यपूर्ण व म्हणून महत्वपूर्ण आहे. परंतु या विषयाला पूर्ण न्याय देणे आता, किंवा यापुढे केव्हांही, संभवनीय होईल ही शक्यता फार कमी आहे. उलट हीच शक्यता अधिक आहे की, जसजसा काळ पुढे जाईल तसतशी आज आपल्या स्मरणांत असलेली नांवे उत्तरोत्तर विस्मृतिच्या गर्तेत जातील व डॉक्टरांच्या जीवनाचे, कार्याचे व संपर्काचे संपूर्ण क्षेत्र शब्दबद्ध करणे अधिकाधिक अव्यवहार्य होऊन जाईल. मेकॉलेने एके ठिकाणी असे म्हटले आहे की, "ज्या पिढितील लोक आपल्या पूर्वजांच्या श्रेष्ठ उपलब्धींचे स्मरण ठेवीत नाहीत त्या पिढीच्या लोकांच्या हातून असे कोणतेही महत्कार्य होणे शक्य नाही की, ज्याचे स्मरण त्यांच्या वंशजांनी करावे". यामुळेच सर्व जीवमान व विजिगीषु देशांत स्वत:चा संपूर्ण इतिहास त्याच्या सर्व बारकाव्यासहित, शोधून काढण्याचा व तो प्रकाशित करण्याचा प्रयास अखंड चाललेला असतो. या दृष्टीने डॉक्टरांच्या कार्याच्या बाबतीत एक मोठी अडचण आहे. एकतर त्यांचा स्वभाव आत्मविलोपी होता. श्री बच्छराजजींनी म्हटल्याप्रमाणे

"लोक प्रसिद्धि पराङ्मुख जीवन" त्यांचे होते. ते त्यांचे धोरण होते व प्रकृतिही होती. त्यांतही क्रान्तिकार्यात जीवनाचा महत्वाचा काळ व्यतीत केल्यामुळे कार्याच्या गुप्ततेचा. संस्कार त्यांचे मनावर अधिकच दृढ झाला होता. संघ सुरु करतानाही ते म्हणत की कागद व लेखणी हातांत न घेता हिंदूंचे विशाल संघटन उभे करण्याची माझी आकांक्षा आहे. त्या काळांतील भिन्न परिस्थितीचे यथार्थ आकलन करणेही आज अशक्य आहे. डॉक्टरांचे संपर्क क्षेत्र किती विस्तृत व विविधतेने नटलेले होते याची कल्पना करणेही आजच्या "प्रतिमानिर्माण" वादी पुढाऱ्यांना संभवनीय नाही. परंतु डॉक्टरांना स्मरणीय वाटणाऱ्या व्यक्तींना विसरणे हे ऐतिहासिक दृष्टीने दोषपूर्ण व भावनेच्या दृष्टीने कृतघ्नतेचे कृत्य ठरेल. त्यामुळे डॉक्टरांच्या प्रसिद्धिपराङ्मुख व गुप्ततेच्या शैलीतूनही जी महत्वपूर्ण नावे आज पाझरुन, (Filter) होऊन आपल्या पर्यंत आलेली आहेत. त्याची आताच नोंद करणे उपयुक्त होईल. नाहीतर राष्ट्रीय कृतज्ञतेच्या क्षेत्राचा क्रमशः अधिकाधिक संकोच होत जाईल.

* * * * *

अशा प्रसंगी पू. डॉक्टरांनी कुणा कुणाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले असेल ? हे स्पष्ट आहे की, सर्वप्रथम त्यांना त्यांच्या पूजनीय रमावहिनींचीच आठवण झाली असेल. सौ. रमावहिनींनी डॉक्टरांच्या ध्येयाशी समरस होऊन अपार कष्ट व मनस्ताप सहन करुन उभय बंधूंच्या स्वभावातील बारकावे सभळून कोंडयाचा मांडा" करण्याच्या कौशल्याने त्यांचा गृहमोर्चा लहानपणापासून सांभाळला. सौ. वहिनींनी बाल्यावस्थेपासून हा मोर्चा सांभाळला नसता तर डॉक्टरांना मोकळया मनाने पुढे झेप घेणे अशक्य झाले असते.

संस्कारक्षम बालवयांत कुटुंबा बाहेर पहिला संपर्क शिक्षण क्षेत्राशीच येतो ? त्यानंतर स्वाभाविकपणे ज्यांचे स्मरण व्हावे असे लोक म्हणजे नील सिटी हाइस्कूलचे प्रमुख तात्याजी वझलवार, ज्यांना केवळ शिक्षण क्षेत्रातच नव्हे तर नागपूरच्या सार्वजनिक जीवनातही सन्मान्य स्थान होते. राष्ट्रीय चतुःसूत्रीतील "राष्ट्रीय शिक्षणा" च्या प्रश्नाकडे गंभीरपणे लक्ष देणारे यवतमाळच्या "विद्यागृहा"चे संस्थापक तपस्वी बाबासाहेब परांजपे व मुख्याध्यापक श्री दत्तोपंत आपटे, तसेच डॉक्टरांना गुरुस्थानी असलेले श्री बाबासाहेब कोलते, या सर्वांचा डॉक्टरांच्या प्रारंभिक जीवनावर झालेला परिणाम नागपूरकरांना माहीत आहे. डॉक्टरांच्या पालकत्वाची जबाबदारी ज्यांना प्रसंगोपात्त वारंवार सांभाळावी लागली ते तात्याजी फडणीसही सर्वांच्या परिचयाचे आहेत.

तसेच देशातील सर्व लोकांना याची जाणीव आहे की, डॉक्टरांच्या प्रारंभिक जीवनापासून त्यांच्या Mentor ची भूमिका डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांनी निभविली होती.

त्याकाळी लोकांची अशी धारणा असे की, पुढे जाऊन सार्वजनिक कार्यात यशस्वी होण्याकरिता Apprenticeship ची आवश्यकता असते. अभ्यासाची आवश्यकता असते. "अभ्यासेचि प्रकट व्हावे - ना तरी झांकोन असावे । प्रकट होवोनि नासावे - हे बरें नव्हे ॥" ही समर्थोक्ति त्या काळीं लोकांना सहज पटत असे. असा उपयुक्त अभ्यास ज्येष्ठ पिढीतील प्रथितयश व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली व अनुभवी समवयस्क मंडळींच्या सहवासांत शक्य असे. या दृष्टीने डॉ. मुंजे यांचे बरोबरच महत्वाचे स्थान ठेवणारे देशभक्त म्हणजे श्री दादासाहेब खापर्डे, लो.ना. बापूजी अणे, "देशसेवक" कार अच्युत बळवंत कोल्हटकर, कर्मवीर बापूजी पाठक, बॅरिस्टर गोविंदराव देशमुख, नीळकंठराव उधोजी, नारायणराव अळेकर, नारायणराव वैद्य, भवानीशंकर नियोगी, "महाराष्ट्र" चे संपादक गोपाळराव ओगले, प्रसिद्ध क्रांतीकारक डॉ. खानखोजे, डॉ. चोळकर, दाजीशास्त्री चांदेकर, विश्वनाथराव केळकर, डॉ. लक्ष्मीनारायण आदि. आनंदाच्या कोणत्याही प्रसंगी डॉक्टरांना या सर्वांची कृतज्ञतापूर्वक आठवण होत असेल. यात शंका नाही.

तसेच असे दिसते की, बालपणापासूनच डॉक्टरांनी समर्थ रामदासांना "राष्ट्रगुरू" म्हणून मान द्यायला प्रारंभ केला होता. परंतु ते समर्थ संप्रदायात कधी सामील झाले नाहीत.

* * * * *

१८८५ नंतर इंडियन नॅशनल कॉंग्रेसला भारतीयांची प्रातिनिधिक सभा मानणे लोकांनी सुरु केले. कलकत्ता येथे झालेल्या कॉंग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशना पासून कॉंग्रेसच्या अधिवेशनांत जाणे नागपूरकरांनी सुरु केले. कॉंग्रेसचे सातवे अधिवेशन सन १८९१ मध्ये नागपूरच्या लालबाग भागात श्री. पी. आनंदाचार्लू यांच्या अध्यक्षतेखाली झाले. सन १८९७ मध्ये कॉंग्रेसचे अधिवेशन अमरावतीला झाले. सन १९०४ पर्यंत नागपूर कॉंग्रेसमध्ये मवाळांचे, नेमस्तांचे प्रभुत्व होते. १९०४ च्या कॉंग्रेसनंतर डॉ. मुंजे यांनी टिळक मताच्या प्रचाराचे काम जोरात सुरु केले. सन १९०५ मध्ये नागपूरला शिवजयंती उत्सव प्रथमच साजरा झाला. अध्यक्षस्थानी डॉ. ल.वा. परांजपे होते. सन १९०६ मध्यें टिळक शिवजयंती उत्सवासाठी कलकत्त्याला जात असतांना नागपूर स्टेशनवर त्यांचे स्वागत करण्यात आले व ते कलकत्ता येथून परततांना दादासाहेब खापर्डे यांनी दि. १३ जूनला त्यांना दोन दिवसाकरिता नागपूरला उतरवून घेतले. कलकत्त्यावरुन सूरत कॉंग्रेसला जाताना व सूरत वरुन कलकत्त्याला परततांना श्री अरविंद घोष नागपूरला थांबले होते व त्यावेळी त्यांचे बरेच कार्यक्रमही झाले होते. १९१८ साली फेब्रुवारी महिन्यात होमरुल च्या प्रचारासाठी टिळकांचा विदर्भात विस्तृत दौरा झाला.

तसे पाहिले तर नाग विदर्भाच्या गैरराजकीय क्षेत्रातही टिळकांच्या जहाल मत प्रणालीला पुढे पोषक होईल अशी मानसिकता निर्माण व्हायला आधीच प्रारंभ झाला होता. सन १८८४ मध्ये स्वामी दयानंदानी नागपूरला भेट दिली त्यावेळी झालेली त्यांची भाषणे प्रखर राष्ट्रवादी अशीच होती. टिळकांच्या "स्वदेशी" चा एक भाग म्हणून ते याचा आग्रह करीत की, आपल्या लोकांनी स्वतःचे उद्योग सुरु केले पाहिजेत. यांतील मर्म समजणारे कांही उद्योगपति विदर्भात आधीच निर्माण झाले होते. अमेरिकेतील यादवी युद्धामुळे इंग्लंड मधील कापड गिरण्यांना अमेरिकन कापूस मिळेनासा झाला. त्यामुळे इंग्लंड मध्ये भारतीय कापसाची मागणी वाढली त्याच सुमारास नागपूरला मोहता यांनी दुसरी कापड गिरणी सुरु केली. सारांश टिळकांच्या विचारांचे स्वागत करण्याकरिता लागणारी मनोभूमिका नागपूर-विदर्भात आधीपासूनच तयार होऊ लागली होती. नागपूर काँग्रेस टिळक विरोधी नेमस्तांच्या हाती असतांना सुद्धा पुढे, मागे सांगितल्याप्रमाणे, १९०४ च्या काँग्रेस नंतर डॉ. मुंजे यांनी टिळकमताचा प्रसार हे कार्य आपले जीवनकार्य असे ठरविल्या नंतर टिळकांना अनुकूल असलेली प्रांताची सुप्त मनोभूमिका प्रकट झाली, व त्यामुळेच सूरत काँग्रेसच्या समर प्रसंगात टिळकांना साथ देण्याकरिता एक मोठा ग्रुप नागपूर वरुन सुरतेला गेला.

त्या कालखंडात राष्ट्रीय सार्वजनिक क्षेत्रीय कार्यकर्ते असणाऱ्या सर्वांचे ध्यान इंडियन नेशनल काँग्रेसच्या ध्येय-धोरणाकडे असे. उपरिनिर्दिष्ट कारणामुळे नागपूरांतील जागृत लोक टिळकवादी होते.

सन १९०७ च्या सूरत काँग्रेस मध्ये नागपूरकरांनी टिळकांच्या बाजूने महत्वपूर्ण काम केले होते. ते इतके प्रभावी ठरले की त्या नंतर सन १९०८ मध्ये काँग्रेसला आपली विधिवत् घटना (Constitution) बनविणे भाग पडले. अनेकांना हे माहीत नाही कीं आपल्या स्थापने पासून २२ (बावीस वर्षे) काँग्रेसने आपले काम घटनाविरहित (Without constitution) चालविले होते. सूरतच्या प्रसंगानंतर प्रथमच काँग्रेसची घटना (constitution) तयार झाली. पू. डॉक्टर या टिळकवादी गटांत होते. टिळकांच्या "केसरी" चा प्रसार विदर्भात बराच असे (विष्णू शास्त्री चिपळूणकरांची "निबंधमाला" व शिवराम महादेव परांजपे यांचे "काळ" मधील अग्रलेख अतिशय मार्मिक व प्रेरक असत. परंतु नागविदर्भात त्यांचा प्रचार फार कमी असे) गोपाळराव ओगले यांचा "महाराष्ट्र" ही "केसरी" चे मार्गदर्शन ध्यानात ठेवून काम करीत असे. टिळकांच्या विदर्भ दौऱ्यांत कार्यक्रमांची पूर्वतयारी करण्यासाठी डॉ. मुंजे यांनी डॉ. हेडगेवार यांना काही ठिकाणी पाठविले होते. टिळक मंडालेवरुन सुटून आल्यावर डॉक्टर त्यांचे कडे दोन दिवस गायकवाड वाड्यात राहिले होते. या अवधीत डॉक्टरांच्या चहापाण्याची जेवणाची,

निजण्या उठण्याची व्यवस्था बरोबर होते आहे किंवा नाही याकडे लोकमान्य स्वत: लक्ष देत असत. डॉक्टर शेवट पर्यंत टिळकांना प्रमाण मानीत असत व त्यांचे विषयी कृतज्ञतेचा भाव डॉक्टरांच्या मनात सदैव राहत असे.

देशभक्तिची प्रेरणा देणाऱ्या घटनांना प्रसिद्धि मिळू नये हे सरकारी धोरण असे. तरी बाबासाहेब नरगुंदकर भावे यांची फांशी, कित्तूरच्या महाराणी चन्नम्मा हिचे निधन, रावसाहेब पेशव्यांची फांशी, वासूदेव बळवंत फडके यांचा पराक्रम, रामसिंग कुका यांचे ब्रम्हदेशांतील तुरुंगात निधन, चाफेकर बंधूचा पराक्रम, अशा घटनांची माहिती झिरपत झिरपत नागपूरपर्यंत येत असे. सन १९०० पासून क्रांतिकार्यातील सावरकर युगाचा प्रारंभ झाला. त्या कालखंडांत इकडचे अनंत लक्ष्मण कान्हेरे व तिकडचे खुदीराम बोस, प्रफुल्लदेव चाकी, बारीन्द्र कुमार घोष आदि क्रांतिकारकांच्या वीरगाथा नागपूर पर्यंत पोहचत होत्या. दि. २३ डिसेंबर १९१२ ला दिल्ली येथे लॉर्ड हार्डिंजवर झालेली बॉंबफेक, दि. १० सप्टेंबर १९१५ ला बालासोर येथे पोलिसांशी झालेल्या चकमकीत जतीन्द्रनाथ मुकर्जी यांचे आत्मबलिदान व दि. १६ नोव्हेंबर १९१५ ला विष्णू गणेश पिंगळे व त्यांचे इतर साथीदार यांना झालेली फाशी, या सर्व घटनांचा परिणाम नागपूरच्या युवकांवर होणे स्वाभाविक होते.

ज्या काळात "वन्देमातरम्" ची घोषणा देणाऱ्याला फटक्याची व जेलची शिक्षा होत असे, इंग्रज सरकारची जबरदस्त जबर सर्वांच्या मनावर असे, त्या काळात अशा पराक्रमांचे समाचार नवजागृतीचे अतिमहत्वपूर्ण व अति कठिण कार्य करीत असत. पुढे होऊ घातलेल्या सर्वच महान राष्ट्रीय आंदोलनांची व संघटनांची मानसिक पार्श्वभूमि यामुळे तयार होत असे. त्यामुळे पुढील काळांत ज्यांनी महान राष्ट्रीय कार्ये उभारली त्या सर्वांच्या मनात अशा हुतात्म्याचे विषयी व त्यांच्या आत्मबलिदानाचे वृत्त प्रचारित करणारांविषयी कृतज्ञतेचा भाव असे. हीच गोष्ट प्रथम महायुद्धाच्या अवधीत झालेल्या घटनांना लागू पडते. राजा महेन्द्र प्रतापने काबूल येथे घोषित केलेले भारताचे प्रोविजनल सरकार, "गदर" पार्टीच्या तत्वावधानाखाली विदेशांत झालेले क्रांतिकार्य, "गदर" पार्टीचे सूत्रधार लाला हरदयाल, भाई परमानंद, डॉ. खानखोजे, पं. रामचंद्र, पं. काशीराम, रासबिहारी बसू, मानवेंद्रनाथ रॉय, वीरेन्द्र चट्टोपाध्याय, चंपक रमण पिल्ले, बरकतुल्ला, महेन्द्र प्रताप, तारकनाथ दास व "कामागाटामारु" कांडाचे प्रवर्तक वीर, या सर्वांचे विषयी तसेच पुढील काळांत ज्या ज्या लोकांनी महान प्रयास केले त्या सर्वांच्या संबन्धी मनात गहन कृतज्ञतेची भावना असे. कारण या लोकांच्या कार्यामुळे अनुकूल मानसिक वातावरण निर्माण झाले नसते तर पुढील काळात कोणतेही मोठे आंदोलन करणे कुणालाही शक्य झाले नसते. अशा अनुकूल मानसिक वातावरणाचे महत्व त्यांनाच आकलन होऊ शकेल की जे त्या काळांतील

आतंकित जनमानसाची यथार्थ कल्पना करु शकतील.

"न त्वया सेविता वृद्धाः" या दोषाला आपण पात्र होऊ नये याची काळजी डॉक्टर घेत असत. या दृष्टीने १९२४ च्या मार्च महिन्यात रत्नागिरी जवळील शिरगाव येथे जाऊन डॉक्टरांनी सावरकरांची भेट घेतली होती. व दोन दिवस त्यांच्या सहवासात घालविले होते. वास्तविक प्रारंभापासूनच सावरकरांना डॉक्टर फार मानत असत. दि. ७ ऑक्टोबर १९०५ ला पुणे येथे सावरकरांनी पेटविलेली विदेशी वस्त्रांची होळी हा त्या प्रकारचा देशांतील पहिलाच कार्यक्रम होता. त्यांचे क्रांतिकार्य तर प्रसिद्धच होते. त्यांनी बाल-वयापासून निर्माण केलेले साहित्य, कविता, पोवाडे त्यांनी अंदमानांतून लिहिलेली पत्रे व कविता, त्यांची "जोसेफ मॅझिनी" ची प्रस्तावना, व "Two Beauties" अशा आवरणात वेष्टिलेले त्यांचे "Indian war of independence" हे सन १८५७ वरील पुस्तक, हे सर्व साहित्य महाराष्ट्रातील सर्वच देशभक्तांना प्रेरणादायी होते. डॉक्टरांचे मनांत त्यांचे विषयी आदराची भावना असे. श्री जमनादास मेहता यांच्यामुळे स्थान बद्धतेतून सावरकरांची सुटका झाल्यावर डॉक्टरांनी त्यांच्या विदर्भाच्या दौऱ्याची सर्व व्यवस्था केली होती. त्यांच्या इतर कार्यक्रमांतही त्यांचा नेहमीच सहभाग असे.

आजच्या मुक्त वातावरणांतच ज्यांचा जन्म झाला ते तर कल्पनेनेही समजू शकत नाहीत की त्या काळांत जनमानस किती आतंकित राहत असेल व ही मनःस्थिति दूर करण्याकरिता जनतेपर्यंत पोहचवायचे संदेश प्रसारित करणे किती अवघड व धोकादायक असेल. त्यामुळे वातावरण निर्मितीचे त्या काळांत असलेले महत्व नवीन पीढीला समजावून सांगणे फार कठिण आहे.

अशी वातावरण निर्मिति अशा अनेक घटनांमुे मुळे, वृत्तांमुळे, साहित्यामुळे हळूहळू व अप्रत्यक्ष रीतीने त्या काळांत होत असे.

बंकिमचंद्र चॅटर्जी यांची (वंदेमातरम् युक्त) "आनंदमठ" कादंबरी, स्वामी विवेकानंदांच्या भाषणांची पुस्तके, योगी अरविंदांचे अग्रलेख, श्यामसुंदर चक्रवर्ती यांचे लिखाण, बंगाली क्रांतिकारकांच्या वीरकथा, भाई परमानंद, स्वामी सत्यानंद व लाला हरदयाल यांचे लिखाण, जासेफ मॅझिनी यांचे आत्मवृत्त व त्याला जोडलेली सावरकरांची प्रस्तावना, मॅझिनीच्या "यंग इंडिया" चा इतिहास व मॅझिनी गॅरिबाल्डी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास, आयर्लंडच्या सिनफेन चळवळीचे व स्वातंत्र्य संग्रामाचे वृत्त, या सर्व साहित्याने रुईच्या कोठारावर पडणाऱ्या ठिणगीचे काम केले होते. त्या काळच्या मनःस्थितीची एक विशेषता आता मागे वळून पाहता जाणवते. वास्तविक सर्व सुशिक्षितांना अमेरिकेचे स्वातंत्र्य युद्ध, फ्रेंच राज्यक्रांती, इंग्लंडची "ग्लोरियस" क्रांति, रशियन राज्यक्रांति, या सर्व क्रांत्याचा इतिहास माहीत होता. परंतु कट्टर राष्ट्रवादी लोकांना विशेष आकर्षण. आयर्लंड

व इटालीच्या स्वातंत्र्य संग्रामांचेच असे. रशियन राज्यक्रांती पासून प्रेरणा घेणारी मंडळीही हळूहळू निर्माण झाली. परंतु त्यांची गणना राष्ट्रभक्तांत नव्हती. (हिंदुत्व निष्ठांना प्रमाणभूत असलेला "हिंदुत्व" हा मौलिक ग्रंथ, डॉ. नारायणराव सावरकरकृत हिंदू विश्वविजयाचा इतिहास, "किम् राष्ट्रम् कस्य राष्ट्रम्" हा प्रबंध, व श्री रा. बा. मावकरांच्या "सावधान" साप्ताहिकांतील जहाल हिंदुत्ववादी लिखाण, तसेच टेरेन्स मॅकस्विनचे "Fundamentles of Freedom", हे सर्व उल्लेखनीय साहित्य पुढील काळांतील आहे.)

गंभीर साहित्याचा प्रसार गुप्तपणे करणे सरकारी Proscription प्रक्षेपामुळे अतिशय जिकीरीचे होऊन बसले होते. त्यामुळे जनजागृति करिता ललित साहित्याचा उपयोग करणे व त्यांतून प्रकारांतराने, अप्रत्यक्षरीतीने व "ध्वनि" चा उपयोग करुन आवश्यक तो संदेश जनते पर्यंत पोहचविणे हाच एक मार्ग मोकळा होता. पुढे ही युक्ति ही सरकारच्या ध्यानांत आली. विशेषकरुन "कीचकवध" नाटकांच्या प्रयोगापासून. परंतु अशा साहित्याला प्रक्षिप्त करणे कायद्याच्या चौकटीत ते बसवू शकत नव्हते.

नाशिकचे शाहीर कवि गोविंद यांच्या कविता, नाथमाधव यांच्या "स्वराज्या" वरील कादंबऱ्या, वि.वा. हडप यांची कादंबरीमय पेशवाई, हरिनारायण आपटे यांची "उष:काल" व "वज्राघात", दुर्गाप्रसाद आत्माराम तिवारी यांची "मराठ्यांची संग्रामगीते" व "झाशीची संग्रामदेवता", मराठ्यांच्या लढ्यांचा इतिहास १८०२ ते १८१८ व "मराठे व इंग्रज" (न.चि. केळकर), पां.कृ. सावळापूरकर यांचा "चुकलेला इतिहास, आप्पासाहेब भोसले यांचा व सीताबर्डीच्या लढाईचा पोवाडा, "श्रद्धानंद" पत्र, मा. बाबासाहेब आपटे यांचे "पंजाब केसरी लाला लजपतराय", तात्या टोपे यांचे अंतिम वक्तव्य, श्रीधर नारायण हुद्दार यांची "अभिनव ग्रंथमाला" व कॉंग्रेस आंदोलनाच्या काळांतील त्यांची गुप्त बुलेटिन्स, चाफेकर बंधूंच्या मातेचे भगिनी निवेदिताशी झालेले संभाषण, तसेच दादाशास्त्री कायरकर व राष्ट्रीय कीर्तनकार पटवर्धन बुवा यांच्या कीर्तनांतील तेजस्वी गीते, हा सर्व साहित्यसंभार त्याकाळी देशभक्तांचा प्रेरणास्रोत असे. विशेषत: "दासबोध" ग्रंथाचे व इतर समर्थ साहित्याचे वाचन मोठ्या प्रमाणावर होत असे. "गीतारहस्य" या संपूर्ण ग्रंथाचे वाचन करणारे निवडक लोक होते, परंतु त्यातील "किं कर्म किमकर्मेति" ची चर्चा सार्वत्रिक असे. पहिल्या महायुद्धाच्या काळांत भारतीय क्रांतिकारकांनी यूरोपांत केलेल्या कार्याचे श्री भूपेन्द्रनाथ दत्त यांनी लिहिलेले वृत्त, तसेच त्या महायुद्धानंतर युरोपाबाहेरील विविध देशांत झालेल्या राष्ट्रीयतेच्या जागरणाचे वृत्त या सर्व गोष्टी या दृष्टीने महत्वाच्या होत्या. अशा साहित्यातून हळूहळू देशभक्तांना अभिप्रेत असलेली मानसिकता तयार होत होती.

अशा साहित्याची निर्मिती व प्रसार करणारांचे विषयी नागपूरच्या तरुण लोकांच्या मनांत आदर व आत्मीयता असे. असे साहित्य लिखित व

मौखिक अधिकाधिक प्रचारित व्हावे याचे महत्व डॉक्टर ज़ाणून होते. त्यामुळे त्यांनी संघाच्या प्रारंभिक काळांतच स्वयंसेवकांकरिता ग्रंथालय सुरु केले होते. सन १८६५ मध्ये सुरु झालेल्या आर्वीच्या लोकमान्य वाचनालयापासून विदर्भ मध्यप्रांतातील इतरही सर्व सार्वजनिक वाचनालयांत असे साहित्य ठेवले जावे, असा त्यांचा प्रयत्न असे. अन्य देशभक्ताप्रमाणे डॉक्टरांच्याही मनांत असे साहित्य लिहिणाऱ्या लेखकांविषयी आत्मीयता असे.

या शिवाय ते राष्ट्रीय वृत्तीच्या दादाशास्त्री कायरकर सारख्या कीर्तनकारांना, कथा वाचकांना, प्रवचनकारांना तसेच दिनकर शास्त्री कानडे वा आहिताग्नि राजवाडे यांच्या सारख्या वक्त्यांना प्रोत्साहन देत असत.

पूर्वी लिहिल्याप्रमाणे नागपूरकरांच्या मनावर काँग्रेसमधील जहाल गटाचा म्हणजे लोकमान्य टिळकांचाच प्रभाव होता. टिळकांनी दिलेली चतु:सूत्री, जिचा अंतर्भाव १९०६ च्या कलकत्ता काँग्रेसचे वेळी अध्यक्ष मा. दादाभाई नवरोजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांत केला, इथे लोकप्रिय झाली होती. डॉक्टरांचे "स्वदेशी" वरील पहिले भाषण त्यांच्या बालवयात रामपायली येथे सन १९०८ च्या विजयादशमी सीमोल्लंघनाचे प्रसंगी झाले व त्या भाषणानंतरच डॉक्टरांचे वर गुप्तचरांचा ससेमिरा सुरु झाला. त्या प्रसंगी विदेशी सरकारच्या रावणाचा पुतळा जाळण्यांत आला, आणि डॉक्टरांनी सर्वांना "वन्देमातरम्" ची घोषणा करायला व स्वदेशीच्या व्रताच्या पालनाची शपथ घ्यायला सांगितले, "स्वदेशी" व "वन्देमातरम्" या मंत्रांचे उच्चारण करणे त्या काळात किती धोकादायक होते याची कल्पना आजच्या पिढीला येणे शक्य नाही. लो.ना. बापूजी अणे यांच्या चरित्र लेखकाने लिहिले आहे की "वन्देमातरम्" चा उद्घोष करणारे, शिवाजी उत्सव - गणेशोत्सव - दासनवमी वगैरेचे संचालन करणारे, तसेच जाहीर सार्वजनिक सभांत भाग घेणारे लोक सिंहाच्या विकराळ दाढेंत हात घालण्यासारखे साहसी काम करीत आहेत, असे मानले जाई.

डॉक्टरांचे सार्वजनिक क्षेत्रातील हे पहिले प्रकट पदार्पण त्यांचे काका ती. स्व. मोरेश्वर श्रीधर उपाख्य आबाजी हेडगेवार यांच्या मुळेच शक्य झाले. संघ संबंधित डॉक्टरांच्या कामात त्यांनी आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत कशी साथ दिली याची माहिती सर्वांना असते. परंतु हे बहुतेकांना माहीत नसते की, डॉक्टरांच्या बालवयापासूनच त्यांना योग्य दिशेने प्रोत्साहन देण्याचे काम त्यांनी सरकारी नोकरीत असूनही, अतिनिर्भयपणे केले होते. उपर्युक्त अवधीत त्यांचे Posting रामपायलीला होते व डॉक्टर त्यांचेकडे रहायला गेले होते.

"स्वदेशी" चे हे व्रत डॉक्टरांनी शेवटपर्यंत पाळले व "स्वदेशी" चा आग्रहपूर्वक प्रचार ते आयुष्यभर करीत राहिले. वर्धा येथील डॉ. खानखोजे यांचे क्रांतिकार्य, त्यांचे येथून पलायन, मेक्सिको च्या क्रांतिमध्ये त्यांनी

निभवलेली महत्वपूर्ण भूमिका व क्रांतिनंतर स्वतंत्र झालेल्या मेक्सिकोंत कृषिविभागाची योग्य घडी बसवून देण्याचे काम, या घटना सर्वविदित आहेत. परंतु हे इतके प्रसिद्ध नाही की, इथे असतांना त्यांनी "स्वदेश बांधव" या संघटनेच्या तत्वावधानाखाली नागपूरला स्वदेशी वस्तु भांडार काढले होते व स्वदेशी वस्तुंची विक्री व प्रचार व्हावा या हेतूने डॉक्टर बराच वेळ त्या भांडारांत बसून विक्रीचे व प्रचाराचे काम करीत असत.

* * * *

बंगालमधील क्रांतिकार्याचे समाचार "युद्धस्यवार्ता रम्या" अशा अलिप्त वृत्तीने ऐकत राहणे डॉक्टरांना फार काळ शक्य नव्हते. स्वत: बंगाल मध्ये जाऊन या कार्यात उडी घ्यावी, अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनांत निर्माण झाली. डॉ. मुंजे आदि मंडळींच्या मनातही असा विचार होताच की, तिथून क्रांतिकार्याचे प्रत्यक्ष शिक्षण घेतलेला कुणीतरी आपल्याकडे नागपुरांत असावा. दोन्ही गोष्टींचा संयोग होऊन डॉ. मुंजे यांनी डॉक्टरांना बंगाल मध्ये पाठविण्याची व्यवस्था केली.

अनुशीलन समितिचे एक जेष्ठ पुढारी श्री त्रैलोक्यनाथ चक्रवर्ति आपल्या "जेल मे तीन वर्ष" या पुस्तकांत लिहितात, "केशवराव के महाविद्यालय के ही एक छात्र श्री नलिनी किशोर गुह उनको तथा डॉ. नारायणराव सावरकर को अनुशीलन समिति में ले आये थे।" या पुस्तकांत श्री त्रैलोक्यनाथ चक्रवर्तीनीं क्रांतिकारी "अनुशीलन समिति" च्या प्रमुख लोकांची छायाचित्रें दिली आहेत, त्यांत डॉक्टरांचे ही छायाचित्र समाविष्ट करण्यांत आले आहे. हे स्पष्ट आहे की, अनुशीलन समितीचे प्रमुख श्री पुलिन बिहारी दास व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांशी डॉक्टरांचे निकटचे संबंध होते. त्याच काळांत त्यांचा श्री रामलाल बाजपेयी या क्रांतिकारकाशी परिचय झाला.

बंगालच्या इतर पुढाऱ्यांपैकी श्री श्यामसुंदर चक्रवर्ती व मौलवी लियाकत हुसेन यांचे विषयी डॉक्टरांचे मनांत विशेष आकर्षण होते. श्री श्यामसुंदर चक्रवर्तीची भाषणे व लिखाण सर्वांनाच प्रखर देशभक्तीची प्रेरणा देत. त्यांच्या सर्व लिखाणाचे हिंदी-मराठीत भाषांतर व्हावें, अशी मा. बाबासाहेब आपटे यांची तीव्र इच्छा होती.

मौलवी लियाकत हुसेन यांचे भाषण कुठेही असले तरी डॉक्टर तेथे अगत्यपूर्वक उपस्थित असत. लियाकत हुसेन स्वदेशी भांडार चालवीत. विदेशी म्हणून त्यांनी तुर्की टोपीचा त्याग केला होता व भगव्या ध्वजाचा स्वीकार केला होता.

मित्र या नात्याने तिकडील कितीतरी बंगाली विद्यार्थी त्यांच्या सहवासांत आले. हावऱ्याचे डॉ. अमूल्यरत्न घोष हे त्यांत प्रमुख होते. त्यांना

"हावरा बाबू" म्हणत.

डॉक्टरांच्या बरोबर इकडील वणीचे डॉ. यादवराव अणे, चांद्याचे डॉ. शंकरराव वैद्य, मुंबईचे डॉ. शंकरराव नाईक (तेंडूलकर), नागपूरचे गोपाळराव देव, आर्वीचे डॉ. (स.नि.) मोहरील तसेच डॉ. नारायणराव सावरकर हे लोक होते. डॉक्टरांना या सर्वांचे स्मरण नेहमी होत असे.

हल्ली ज्याला आपण "सेवाभारती" व "सेवा विभाग" म्हणतो त्याचा वास्तविक प्रारंभ डॉक्टरांच्या बंगालमधील वास्तव्यातच झाला. दामोदर नदीला महापूर आला त्यावेळी नदी पलीकडील उपाशी लोकांत वाटण्याकरिता मुरमुऱ्याची पोती पाठीवर घेऊन साहसपूर्वक महापुरांत उडी घेण्याचे व तीरापलीकडील लोकांत मुरमुरे वाटण्याचे काम डॉक्टरांनी केले. कलकत्त्यापासून साठ मैल दूर भरलेल्या गंगासागरच्या यात्रेत "हैजेका प्रकोप" (कॉलरा) झाला त्यावेळी आपल्या मित्रांना बरोबर घेऊन हैजाग्रस्त लोकांची सेवाशुश्रषा डॉक्टरांनी केली.

सन १९१६ मधे नागपूरांत प्लेगची साथ आली त्यात पीडित लोकांचीही डॉक्टरांनी शुश्रुषा केली. आजच्या "सेवाभारती" चा खऱ्या अर्थी प्रारंभ या घटनां मधून झाला आहे. या मुळे या सर्वप्रसंगी ज्यांनी डॉक्टरांना साथ दिली ते सर्वच आम्हाला संस्मरणीय वाटतात.

बंगाल मधून परत आल्यानंतर डॉक्टरांनी नागपूरला केंद्र करुन क्रांतिकार्याचा विस्तार केला. या कार्यात त्यांचे सर्वात मोठे सहयोगी व जिवलग श्री भाऊजी कावरे होते. त्यांचा केवळ रक्तरंजित क्रांतिच्या मार्गावरच विश्वास होता. ते डॉक्टरांचे अभिन्न हृदयी मित्र होते. भाऊजींच्या व्यतिरिक्त क्रांतिकार्यांत उपयुक्त तरुण निर्माण व्हावेत या उद्देशाने, माध्यम या नात्याने "नागपूर व्यायामशाळा" चालविणारे अण्णा खोत, पिस्तूल आदि शस्त्रांची दुरुस्ती करुन देणारे दादासाहेब बक्षी, क्रांतिकार्याकरिता धन पुरविणाऱ्या देशभक्त मालगुजार लोकांचे "नरेन्द्र मंडळ" ज्यांत घोटीवाडीचे समीउल्लाखान ही सामील होते, गोव्यावरुन गुप्तपणे शस्त्रे आणण्याकरिता डॉक्टरांनी ज्यांना पाठविले होते ते नानासाहेब तेलंग तसेच १९१८ मध्ये समुद्र मार्गाने येणाऱ्या शस्त्रास्त्रांचा संग्रह गुप्तपणे आणण्याकरिता डॉक्टरांनी ज्यांची नियुक्ति केली होती ते यवतमाळचे वामनराव धर्माधिकारी, कामठीचे कांही सेनाधिकारी, क्रांतिकारक तरुणांना निशाणबाजीचे शिक्षण देणारे नाना साहेब टालाटुले व भाऊसाहेब टालाटुले, पहिलेही पकडल्या गेलेले वर्ध्याचे अर्जुनलाल सेठी, उत्तरेकडील क्रांतिकारकांशी संबंध प्रस्थापित करण्याकरिता ज्यांना डॉक्टरांनी अमृतसरला पाठविले ते मा. आप्पाजी जोशी, सन १९१७ च्या "राष्ट्रीय स्वयंसेवक मंडळा" चे चिरंजीवलाल बडजाते, अजमेरला केंद्र बनवून हिंदी-भाषी प्रदेशांत क्रांतिकार्याचे जाळे विणण्याकरिता, बालवीर हरकरे व नानाजी पुराणिक आदि वीस तरुण यांना बरोबर देऊन, ज्यांना डॉक्टरांनी

पाठविले होते ते वर्ध्याचे गंगाप्रसादजी पांडे, तसेच त्यावेळच्या Central provinces-berar मधील क्रांतिकार्यात सामील होणारे जवळजवळ १५० (दीडशे) तरुण या सर्वांचे स्मरण डॉक्टरांना कोणत्याही आनंदाच्या प्रसंगी उत्कंटतेने होत असेल यात शंका नाही.

प्रथम महायुद्धाच्या निकालानंतर "इंग्लंडची अडचण ही भारताची संधी" हा विचार कालबाह्य झाला व त्या स्थितीत, आतापर्यंत पसरलेल्या क्रांतिकार्याला आटोपते घेणे डॉक्टरांना भाग पडले.

(पुढील काळात प्रसिद्ध क्रांतिकारी राजगुरु नागपूर संघाच्या मोहिते शाखेवर काही काळ येत असत व त्यांना भूमिगत ठेवून सरकार पासून वाचविण्याचा प्रयत्न डॉक्टरांनी केला होता. हे आता सर्व विदित आहे. परंतु मद्रासचे प्रांत प्रचारक मा. दादाराव परमार्थ डॉक्टरांच्या सांगण्यावरुन काही दिवस सरदार भगतसिंग यांच्या खिदमतींत होते. या गोष्टीची वांच्यता कुठेही होऊ नये याची काळजी दादाराव शेवटपर्यंत घेत.)

* * * *

क्रांतिकार्याची तीव्रता वाढविण्याचे मागे हा विचार होता की, "इंग्लंडची अडचण ती भारताची संधी". परंतु महायुद्धाचा निर्णय मित्रराष्ट्रांच्या बाजूने लागल्यामुळे हे विचारसूत्र कालबाह्य झाले व उलटपक्षी नवीन परिस्थितींत आतापर्यंत विस्तारलेल्या क्रांतिकार्याच्या पसाऱ्याला नीट आवरते कसे घ्यावे व त्यांत गुंतलेल्या कार्यकर्त्यांचा बचाव कसा करावा- पुनर्वसन कसे करावे, याकडेच सारे लक्ष केन्द्रित करण्याची आवश्यकता निर्माण झाली. हें कार्य म्हणजे Operation Salvage च होते. डॉक्टरांनी हे किचकट काम पूर्ण करीत आणले तो तिकडे राष्ट्रीय स्तरावर टिळक युगाचा अंत झाला व गांधीयुगाचा प्रारंभ झाला. आतापर्यंत ज्या वातावरणांत त्यांनी काम केले होते ते वातावरण एकदम बदलले, जनतेच्या आतापर्यंतच्या मानसिकतेतही स्वाभाविकपणेच परिवर्तन झाले.

या सर्व स्थित्यंतराचे सूक्ष्म निरीक्षण व अध्ययन डॉक्टरांनी चालविले होते. परंतु त्याच बरोबर बाल्यकालापासूनच सार्वजनिक जीवनात सर्व दृष्टीनी क्रियाशील राहूनही, परिस्थितिचे अध्ययन व ध्येय धोरणाविषयी गहन चिंतन त्यांनी अखंड चालविले होते. स्वराज्य प्राप्ती हे तात्कालिक (immediate) लक्ष्य व ते साध्य करण्याकरिता माध्यम म्हणून काँग्रेस व हिंदू सभा हे राजकीय पक्ष, हे त्यांनी ठरविले होते. परंतु राष्ट्राच्या दूरगामी कल्याणाच्या दृष्टीने मूलगामी विचार करतांना त्यांच्या हेही ध्यानांत आले होते की, केवळ स्वराज्य प्राप्तीने राष्ट्राचे अंतिम कल्याण साध्य होऊ शकत नाही. त्याकरिता अतिशय दूर–दृष्टि ठेवून, मौलक चिंतनांच्या आधारावर नवीन मार्ग शोधण्याची आवश्यकता आहे. अशा दूरगामी, मूलगामी, मौलिक

चिंतनाची फलश्रुती म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना. स्वराज्य प्राप्तिच्या हेतूने राजकीय पक्षांत राहून काम करणे हे तात्कालिक धोरण व हिंदू राष्ट्राच्या परमवैभवाच्या दृष्टीने सामर्थ्य संपादन करण्यासाठी अजेय हिंदूसंघटन निर्माण करणे हे अंतिम जीवनकार्य, असा विचार त्यांच्या मनांत दृढ झाला व त्या दृष्टीने त्यांनी दूरगामी कार्याचा "हरिः ओम्" केला.

## कुंपण (Fencing)

होऊ घातलेल्या किंवा नवीनच लावलेल्या रोपट्यांच्या कुंपणाची व्यवस्था हा फार महत्वाचा विषय आहे. परंतु असे बहुतेकांच्या ध्यानांत राहत नाही. कोणत्याही संघटनेचा इतिहास समजून घेताना सामान्य वाचक त्या संघटनेच्या स्थापने पासूनच प्रारंभ करतात. कारण प्रत्यक्ष स्थापने पूर्वी कुंपण म्हणून व पायाभरणी म्हणून कराव्या लागणाऱ्या परिश्रमांचे महत्व सहजासहजी ध्यानांत येत नाही. संघाचाही विचार करतांना हा पैलू दृष्टिआड होतो.

१९२० पासून गांधीयुगाचा प्रारंभ झाल्यानंतरही काँग्रेस मधील सर्व लोकांना गांधीजींच्या सर्व कल्पना मान्य होत्या असे नाही. कौन्सिल प्रवेशा विषयीची गांधीजींची भूमिका अमान्य करणाऱ्या लोकांनी बॅ. चित्त-रंजनदास व पं. मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली, काँग्रेसच्या अंतर्गतच परंतु स्वतंत्र गटाची स्थापना "स्वराज्य पक्ष" या नावाने केली होती. काँग्रेसच्या अंतर्गतच परंतु एक स्वतंत्रगट या नात्याने स्थापन झालेला "काँग्रेस सोशालिस्ट ग्रुप" याच श्रेणीत होता. हे सर्व काँग्रेस मध्ये होते परंतु कांही विषयांवरील गांधीजींची मते आपल्याला मान्य नाहीत असे ते घोषित ही करीत होते. हीच स्थिति सुभाषचंद्र बोस यांची होती. तरीपण काँग्रेस पासून पृथक असा "फॉर्वर्ड ब्लाक" स्थापन करण्याची घोषणा करीपर्यंत सुभाषबाबू व त्यांचे अनुयायी काँग्रेस मध्येच होते. पं. नेहरु व सरदार पटेल तर शेवटपर्यंत प्रकटपणे बोलत होते की, 'गांधीजींची "सत्य-अहिंसा" आम्हाला सिद्धांत म्हणून मान्य नाही. परंतु रणनीति (strategy) म्हणून आम्ही "सत्य-अहिंसे" चा स्वीकार करीत आहोत. आज त्या शिवाय दुसरे गत्यंतरही नाही.'

सारांश, विभिन्न विषयावर गांधीजींशी मतभेद असणारे लोक काँग्रेस मध्ये होते. परंतु तरीही "गांधीयुग" हा शब्द प्रचलित झाला तोही सार्थच होता. कारण अ.भा. काँग्रेस कमिटीवर गांधीजींची पकड होती. तिचे ध्येय-धोरण कार्यक्रम गांधीजींच्या इच्छेनुसार ठरत असत व विभिन्न प्रांतिक काँग्रेस कमिट्याही गांधीवादी पुढाऱ्यांच्याच ताब्यात होत्या.

गांधी युगाच्या प्रारंभिक काळांत गांधीवादी नसलेल्या लोकांच्या हाती असलेल्या दोनच प्रांतिक काँग्रेस कमिट्या होत्या. एक विदर्भाची, जिचे नेतृत्व लोकनायक बापूजी अणे करीत होते व दूसरी मराठी मध्यप्रांताची

जिचे नेतृत्व डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवार, डॉ. ल.वा. परांजपे व मा. अप्पाजी जोशी करीत होते. गांधीजींची मुस्लिमतोषण नीति चुकीची आहे, असे मत प्रकटपणे व्यक्त करणाऱ्या दोनच प्रांतिक काँग्रेस कमिट्या देशांत होत्या. लो.ना. बापूजी अणे यांनी तर पुढील काळांत "कम्यूनल अवार्ड" च्या प्रश्नावर काँग्रेसच्या विरुद्ध निवडणूका लढविणारा "काँग्रेस नॅशनॅलिस्ट पक्ष" पं. मदनमोहन मालवीय व डॉ. मुंजे यांच्या मदतीने स्थापन केला होता. कौन्सिल प्रवेशाच्या प्रश्नावर काँग्रेसच्या अंतर्गत परंतु स्पष्टपणे पृथक अशा स्वराज्य पक्षाने विविध प्रांतात निवडणूका लढविल्या होत्या व कमी-अधिक यश प्राप्त केले होते. परंतु हे सर्वमान्य ऐतिहासिक सत्य आहे की, Central provinces and Berar च्या असेम्बली निवडणुकांत जितके भरघोस यश डॉ. मुंजे यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्षाला प्राप्त झाले तितके अन्य कोणत्याही प्रांतांत प्राप्त झाले नाही. असेंब्लीच्या Floor वर ब्रिटिश सरकारचा पराभव करण्याचे श्रेय याच प्रांताला प्राप्त झाले होते. बॅरिस्टर मोरुभाऊ अभ्यंकर यांच्या हाती मराठी मध्यप्रांत काँग्रेस कमिटी जाईपर्यंत या प्रांतात ही स्थिति कायम राहिली.

नागविदर्भातील काँग्रेसचे तत्कालीन नेतृत्व अखिल भारतीय काँग्रेसच्या शिस्तीचे पालन करणारे असेच होते. तथापि हिंदुत्वाच्या दृष्टीने संपूर्ण देशांत काँग्रेसच्याच धोरणामुळे अतिशय प्रतिकूल वातावरण निर्माण होत आहे याची स्पष्ट जाणीव ही या दोन्ही प्रांताच्या तत्कालीन काँग्रेस पुढाऱ्यांना होती. "तुम्ही मला वाटल्यास गधा म्हणा, पण "हिंदू" म्हणू नका," असे अभिमानाने म्हणणाऱ्या पुढाऱ्यांची संख्या देशांत झपाट्याने वाढत आहे, हे त्यांना कळत होते. त्यामुळे येथील सर्वच हिंदुत्ववादी काँग्रेस पुढाऱ्यांच्या समोर हा प्रश्न होता की, देशांत वाढत चाललेल्या या वातावरणापासून आपल्या दोन प्रांतांना कसे वाचविता येईल? संघ संस्थापनेचा निश्चय केलेल्या प.पू. डॉ. हेडगेवारांच्या तर हे ध्यानांत आलेच असेल की, बाहेर वाढत चाललेले हे वातावरण नागविदर्भात आले तर संघा सारख्या संघटनेची पायाभरणी करणे व तिला मजबूत कुंपण बांधणे अशक्य होउन जाईल.

संघ पूर्वकाळातील या भागांतील घटनाक्रमाचा विचार केला तर हे स्पष्टपणे जाणवते की, प.पू. डॉक्टरांनी दूरदृष्टिने या संकटाचे स्वरुप अचूकपणे हेरले होते व ते ध्यानांत घेऊन त्याला रोखण्याकरितां, Pre-emptive action ला अन्य सर्व हिंदुत्वनिष्ठ लोकांना बरोबर घेऊन प्रारंभही केला होता.

हा विषय पुढे नेण्यापूर्वी एक स्पष्टीकरण येथेच देणे आवश्यक आहे. "हिंदू" - "हिंदू-संघटन" या विषयींच्या प.पू. डॉक्टरांच्या संकल्पने विषयी एक भ्रम त्या काळांत निर्माण केला गेला होता व तो आजतागायत कायम ठेवण्यात आला आहे. तो म्हणजे मुस्लिमतोषणनीतीचा विरोध म्हणजे

मुस्लिमांचा विरोध. हे अर्थात असत्यच आहे. या विषयींची संघाची भूमिका प.पू. श्री. गुरुजी व श्री जिलानी यांच्या संवादांतून सर्वंकष रीतीने प्रकट झाली आहे. तिची पुनरुक्ति इथे करण्याची आवश्यकता नाही. आपापल्या पंथ-रिलिजन-उपासनापद्धति पूर्णपणे कायम ठेवून भारतमातेचे सर्व पुत्र मिळून आपण एक राष्ट्र आहोत, एक युनिट आहोत, ही धारणा टिळक युगांत होती व त्यामुळेच टिळक-युगात बॅ. जिन्ना, महम्मद इकबाल, शौकतअली, आदि मंडळी राष्ट्रवादी होती. गांधीयुगांतील तोषणनीतीमुळे मुसलमानांतील चतुर पुढाऱ्यांच्या हे ध्यानांत आले की, राष्ट्रीय मुख्यप्रवाहांत सामील न होण्यामुळे आपला, मुसलमान या नात्याने अधिक लाभ होऊ शकतो, अधिक सौदेबाजी करता येते. (सरकारशी व कॉंग्रेसशी ही) व त्यामुळे अधिक निहित स्वार्थ साधता येतो. त्यामुळे अशा सांप्रदायिक पुढाऱ्यांनी सर्व साधारण मुस्लिम समाजाची दिशाभूल करुन त्यांना राष्ट्रीय मुख्यप्रवाहापासून अलग ठेवण्यांत यश संपादन केले. प.पू. डॉक्टरांची भूमिका ही "सर्व मिळून एक अखंड राष्ट्र" हीच होती त्यामुळे तोषणनीतीला त्यांचा विरोध होता. विरोध मुस्लिमांचा नव्हता,- मुस्लिम तोषणनीतीचा होता. अर्थात गांधीजींच्या धोरणाविरुद्धची प्रतिक्रिया दुसऱ्या टोकाला जाणे शक्य होते ब त्यामुळे Negatively मुस्लिम विरोधही कांही क्षेत्रांत प्रकट होत होता. परंतु डॉक्टरांची भूमिका तशी नव्हती.

दि. ५ सप्टेंबर १९९७ च्या हिन्दुस्तान टाईम्स च्या अंकांतील श्री राकेश सिन्हा यांच्या "Not a negative role" या लेखांत म्हटल्या गेले आहे.

Nagpur, where the R.S.S. was first organised in 1925, was prone to Hindu Muslim riots. When a riot broke out in 1927, The RSS acted as deterrent to the out break instead of playing an offensive role and unleashing anti Muslim propoganda which was expected by a section of local Hindu leaders and apprehended by the Muslims. This removed the suspicion from the muslim mind against the RSS whose presence in the central provinces (c.p.) there upon, evoked no protest from the Muslim population".

"It was none other than a Muslim Member of the c.p. council who refuted the allegation that the RSS was a communal organisation. During the debate on the R.S.S. in the Council in March 1934, M.S. Rahman said, "no sane Muslim would take any exception to any Hindu organisation provided its object is not agressive and militant, but simply the betterment

of the Hindu Community as a whole". He asked the Government whether any Muslim organisation had sent a representation to the government calling upon the government to ban the RSS ?

The leader of the House Raghavendra Rao said that there had not been any representation by any Muslim organisation against the RSS."

अशा रीतीने डॉक्टरांची "हिंदुत्व" संकल्पना सकारात्मक (positive) होती, Negative (नकारात्मक) नव्हती. अर्थात् त्यांना मुस्लिम तोषणनीतीचा विरोध, bullying tacties या नात्याने मुस्लिमांनी कुठेही अतिरेकी कारवाया केल्या तर त्याला नियंत्रित करण्याचे प्रयत्न व त्या दृष्टिने भावात्मक व सक्रिय हिंदुत्वनिष्ठेचे व्यापक जागरण या सर्व गोष्टी अनुस्यूत होत्या. मुस्लिम विरोध नव्हे, पण मुस्लिमांच्या अतिरेकी कारवायांच्या विरुद्ध जनजागरण हा डॉक्टरांच्या भावात्मक हिंदुत्वाचा भाग होता व संघ स्थापनेपूर्वीच्या काळांत या सकारात्मक जनजागरणाच्या माध्यमातून, होऊ घातलेल्या संघ रोपट्याकरिता मजबूत कुंपणाचे काम करणारे वातावरण निर्माण करण्यांत डॉक्टरांनी फार परिश्रम घेतलेले होते, असे दिसते.

## बीजारोपणापूर्वीच कुंपणाची व्यवस्था

टिळकयुगांतील राष्ट्रवादी मुसलमान पुढाऱ्यांच्या मनोवृत्तीत बदल व्हायला प्रारंभ संघस्थापनेच्या पूर्वीच झाला होता. मोपल्यांचे बंड व खिलाफतचा प्रश्न यावरील काँग्रेसच्या भूमिकेमुळे मुस्लिम सांप्रदायिकतेला प्रोत्साहन मिळेल व खरा राष्ट्रवाद मागे पडेल, असा स्पष्ट इशारा बॅ. जीना आदि त्यावेळच्या राष्ट्रवादी काँग्रेस पुढाऱ्यांनी काँग्रेसला व गांधीजींना वारंवार दिला होता. परंतु त्याचा कांहीही उपयोग न होता गांधीजींनी आपले धोरण तसेच पुढे चालविले. काँग्रेसमध्ये सामील असलेल्या राष्ट्रवादी मुसलमानांची उपेक्षा करुन, त्यांना "taken for granted" समजून, काँग्रेसला शिव्या देणाऱ्या कट्टरवादी सांप्रदायिक पुढाऱ्यांनाच भारतीय मुस्लिम समाजाचे खरे प्रतिनिधि म्हणून मान्यता द्यावयाची व त्यांच्या समोर लोटांगण घालावयाचे, हे धोरण काँग्रेस, गांधीजी यांनी स्वीकारले. रणनीती म्हणून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा Formula ब्रिटिश सरकारच्या तोंडावर फेकणे आवश्यक झाले तर मुस्लिम समाजाचे प्रतिनिधि म्हणून राष्ट्रवादी मुस्लिम पुढाऱ्यांना मान्यता द्यावयाची व कट्टरवादी मुस्लमांची दखलही घ्यायची नाही, हे धोरण लो. टिळकांचे होते. गांधीजींनी याच्या बरोबर उलट धोरण स्वीकारले. त्यामुळे काँग्रेस मधील राष्ट्रवादी मुसलमान पुढाऱ्यांना वाटू लागले की, यापुढे राष्ट्रवादी भूमिका कायम ठेवून काँग्रेस मध्ये राहण्यांत काय अर्थ आहे. आपले म्हणणे ऐकायला गांधीजी तयार नाहीत. आपण राष्ट्रवादी म्हणून काँग्रेसमध्ये राहिलो

तर आपली स्थिति "घर की मुर्गी दाल बराबर" अशीच राहणार. उपयोग तर कांहीच नाही. त्यापेक्षा काँग्रेसच्या बाहेर जाऊन काँग्रेसला शिव्या घालण्याचे धोरण आपण स्वीकारले तर, गांधीजी आपली दखल घेतील, आपल्यापुढेही लोटांगण घालतील. राष्ट्रीय मुख्य प्रवाहांत राहण्याचा निश्चय आपण स्वतः केला तरी त्यापासून लाभ कांहीच व्हायचा नाही. त्यापेक्षा सरळ विरोधी भूमिका व bullying tacties करणे यातून कांही लाभ तरी होईल, या विचार प्रक्रियेतून ही राष्ट्रवादी मंडळी राष्ट्रीय मुख्य प्रवाहांतून बाहेर पडली व कट्टर सांप्रदायिक बनली. (गांधीजी वारंवार म्हणत की, Every Hindu is a Coward and every Muslim is a bully) काँग्रेसच्या या भूमिकेमुळे सर्वत्र bullying tacties वाढायला लागल्या होत्या, नागपूरवरही त्याचा परिणाम झाला होता व त्यातूनच १९२३ मध्यें 'दिंडी सत्याग्रहाची' आवश्यकता निर्माण झाली होती. हा सत्याग्रह नागपूरच्या मुसलमानांच्या bullying tacties ना रोखण्याच्या हेतूने झाला होता.

या सत्याग्रहाचा संपूर्ण इतिहास इथे देण्याची आवश्यकता नाही. ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ऐवढीच आहे की, एरवी मुस्लिम विरोधी नसलेल्या नागपूरच्या हिंदू ना या मुस्लिम दादागिरीला आळा घालणे आवश्यक वाटले व त्या निमित्ताने भावात्मक हिंदुत्वनिष्ठा मनांत ठेवणारे लोक या सत्याग्रहांत भाग घेण्याकरितां पुढे आले. सर्वांच्याच मनांत ही भावना होती. परंतु अशा सर्वांशी संपर्क स्थापन करणे, त्यांना कार्यप्रवृत्त करणे हे कार्य डॉ. हेडगेवार व डॉ. परांजपे यांनी, स्वतःला मागे ठेउन व इतरांना पुढारीपण देउन केले. या सत्याग्रहांत कोण कोण सामील झाले होते याचा विचार आज उद्‌बोधक आहे.

दिंडी सत्याग्रह लक्ष्मीपूजनाचे दिवशी गुरुवारी दि. १ नोव्हेंबर १९२३ पासून सुरु झाला. दि. १७ नोव्हेंबरला सरकारी मध्यस्थतेखाली कांही तडजोड झाली. परंतु लागलीच सोमवार दिनांक १९ नोव्हेंबरला कार्तिकी एकादशीचे दिवशी झगडा पुन्हा सुरू झाला.

या सर्व प्रकरणांत कांही गोष्टी विशेष उल्लेखनीय अशा होत्या. दिंडीची मिरवणूक निघाली तर डॉ. ल.वा. परांजपे यांच्या निवास स्थानासमोर दिंडीवर हल्ला होण्याची संभावना अधिक आहे, असे सर्वांना वाटत होते. अशा वेळी राजे बहादूर रघुजीराव भोसले, परांजपे यांच्या घरापाशी दिंडी येण्याच्या वेळेच्या आधीपासून तो दिंडी पूर्णपणे निघून जाईपर्यंत त्या स्थानावर स्वतः पूर्णवेळ उभे राहत. नेतृत्व करणाऱ्या मंडळींत राजे लक्ष्मणराव भोसले व त्यांच्या वाड्यांतील सर्वश्री मोहिते, महाडिक, शिर्के, पालकर, भोसले वगैरे मंडळी सामील होते. त्यांचे बरोबर सर गंगाधरराव चिटणवीस, कृष्णशास्त्री घुले, नारायणराव बढे, विश्वनाथ व्यंकोबा हरदास, जयकृष्ण उपाध्ये, दादा शास्त्री कायरकर, तिजारे, बुधवारींतील उदाराम पहिलवान, धोंडबा साव, डॉ.

चोळकर, डॉ. परांजपे, वेळेकर, नारायण पेंटर, गोपाळराव ओगले, चांदेकर ही मंडळी होती.

"महाराष्ट्र" पत्राने दर दिवशी पकडल्या गेलेल्या सर्व लोकांची नावे प्रकाशित केली. ही सर्व नांवे पाहिलीत तरी ध्यानात येते की, दिंडी सत्याग्रहात नागपूरच्या हिंदू समाजाच्या सर्व विभागांचे लोक हिरीरीने सामील झाले होते. केवळ उदाहरण म्हणून पकडल्या गेलेल्या लोकांची पुढील यादी पहा- दि. ६ मंगळवार, व्यंकटराव निंबाळकर, उमराव बाळकृष्ण, किसन नारायण क्षेत्रपाल, तुळशीदास लक्ष्मणदास, देवराव विठ्ठलराव, लक्ष्मणराव गणपतराव, बाबूराव गणपतराव, सर्जेराव श्रीपतराव, नारायणराव महिपतराव, बजरंग लहानबा, दौलतराव मारुतराव, रामचंद्र गोविंद, प्रयागदत्त शुक्ल, शिवगोविंद, छगनलाल, चुन्नीलाल, रघुनाथराव निंबाळकर, गणपति विठोबा, वासूदेव बाजीराव, मारोतराव बापूजी, जगोबा नारायण व नारायण मनाजी.

बुधवार दि. ७ - महादेव पोमा कुणबी, नारायण जागो, गणपति जागो, रामा लिंबानी, शिवराम गणपति, सोमा डोमा, गणपत झिबल, रामकरण देवीसिंग, मनीराम कारुजी, महादेव विठोबा, विठोबा राघोबा, लक्ष्मण नत्थू, लक्ष्मण लहानू, कोद्या तुकाराम, सखाराम मडगू, मोतीराम मारुति, मारुति विश्वनाथ, कवडू कृष्णा.

अशी पकडल्या गेलेल्या लोकांची प्रत्येक दिवसाची यादी "महाराष्ट्र" ने प्रकाशित केली. त्यावरुन सत्याग्रहाच्या "अखिल हिंदू" स्वरुपाची कल्पना येते. हे "अखिल हिंदू" स्वरुप शत्रुपक्षाला अनपेक्षित होते. त्यामुळे दि. १७-११-१९२३ ला ते समेटा करिता तयार झाले.

तडजोड झाल्यानंतर त्यांना खात्री झाली की, आता हिंदू समाज नेहमी प्रमाणे गाफील होऊन राहणार. त्यामुळे ताबडतोब पुन्हा कुरापत काढली तर हिंदू बेसावध अवस्थेत सापडतील. म्हणून त्यांनी लगेच दोन दिवसांनी दि. १९-११ ला कार्तिकी एकादशीचे दिवशी सोमवारी पुन्हा उचल घेतली. त्यादिवशी दुपारी ४.३० ला गांजाखेत भागांत पहिली चकमक झाली. दि. २० ला मुसलमानांनी कोष्टीपुऱ्यावर आक्रमण केले. परंतु उदाराम पहेलवान वगैरे लोकांनी मोमीनांना हंसापुरी-शनिवारीकडे खदेडून लावले व यावेळी जबरदस्त मार दिला. त्याच वेळी हिंदूनी घोषित केले की शुक्रवार दि. २३ नोव्हेंबरला कार्तिक पोर्णिमेच्या दिवशी गणेशपेठेच्या गणपति विसर्जनाची मिरवणूक दिंडीसह निघेल व नागपूरच्या सर्व भागांतून वाजत गाजत फिरुन शुक्रवार तलावावर विसर्जनाचा कार्यक्रम करील.

दि. १९ व २० च्या अनुभवानंतर ही घोषणा ऐकल्यावर दंगेखोरांच्या मनात दहशत निर्माण झाली व दि. २१ नोव्हेंबर ला मुंबई

वरुन मौलाना शौकत अली यांनी डॉ. मुंजे यांना पुढील तार पाठविली- "तापाने पडलो आहे. डॉक्टरांनी मला हालचाल मना केली आहे. नागपूरच्या हिंदू मुसलमान बांधवांनी जुने बंधुप्रेमाचे नाते कायम ठेविले पाहिजे, अशी त्याना माझी प्रार्थना आहे. प्रेमाने वागण्यातच फायदा. ईश्वरकृपेने बरा झालो तर नागपुरास लवकरच येईन."

ही तार किती समजूतदार पणाची आहे. परंतु ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे की, हा समजूतदारपणा जागृत व्हायला दि. १-११ पासून दि. २१-११ पर्यंतचा अवधि जावा लागला व तोही दि. २० ला जबर मार पडे पर्यंत.

गांधीजींची मुस्लिम नीति चुकीची आहे हे कालांतराने पं. नेहरु यांच्या ध्यानांत आले. हे धोरण बदलले पाहिजे, स्वयंघोषित मुस्लिम पुढाऱ्यांना मुसलमानांचे प्रतिनिधि न मानता काँग्रेसीयांनी सरळ सामान्य मुसलमानांपर्यंत पोहचले पाहिजे व त्यांना राष्ट्रीयत्व समजावून सांगितले पाहिजे, असे पं. जवाहरलालजींनी दि. १९ मार्च १९३६ ला सार्वजनिक भाषणांत सांगितले व Muslim mass contact च्या अभियानाचा सूत्रपात केला. परंतु हे अभियान पुढे चालले नाही.

या संदर्भात प.पू. डॉक्टरांचे आर्वी येथील सन १९३६ च्या वर्धा जिल्हा शीत शिबिराच्या समारोपाचे भाषणाचा एक अंश उद्धृत करणे अनुचित होणार नाही. त्या प्रसंगी डॉक्टर म्हणाले होते, "हिंदू मुस्लिम एकता दोघांनाही अभिप्रेत आहे. महात्माजींना व मला. परंतु ही एकता साध्य कशी करता येईल, या विषयी आमचे मतभेद आहेत. गांधीजींचे मत सर्वांना माहीत आहे. मला मात्र महाभारतांत दिलेला सिद्धांतच व्यावहारिक वाटतो. महाभारतांत म्हटले आहे -

*"ययोरेव समं वित्त - ययोरेव समम् बलम्*
*"तयोर्विवाहो मैत्रीच - न तु पुष्ट विपुष्टयोः ॥"*

ज्यांची आर्थिक स्थिति सारखी असेल त्यांच्यातच विवाह संबंध संभवतात व ज्यांची शक्ति समान असेल त्यांच्यातच मित्रता संभवते. पुष्ट व विपुष्ट, म्हणजे बलवान व दुर्बल यांच्यात मित्रता होऊ शकत नाही. जोपर्यंत मुसलमानांना असे वाटत नाही की, हिंदूही आपल्या इतकेच बलवान आहेत तो पर्यंत हिंदूशी एकता करण्याची इच्छा त्यांच्या मनांत जागृत होऊ शकत नाही. संघाच्या प्रयत्नाने हिंदू समाज संघटित व बलवान झाला की, त्याच्यापुढे मुसलमान स्वखुशीने मैत्रीचा हात पुढे करतील."

जागरुक मुसलमानांच्याही हे ध्यानात येऊ लागले होते की,

मुस्लिमांचे आपण प्रतिनिधि आहोत असा दावा करणारे मुसलमान पुढारी यांना मुसलमानांच्या उद्धाराची चिंता नाही, ते स्वतःच्या फायद्या करिता राजकीय सौदेबाजी करतांना आपला (म्हणजे मुसलमान समाजाचा) उपयोग केवळ दबाव आणण्याकरिता करतात व त्यांतून मिळणारे लाभ स्वतःच उपटतात. अकबर-ए-इलाहाबादींनी म्हटले,

*"आओ तुम्हे दिखाये - इस्लामकी रौनक का हाल,*
*कौन्सिल में बहोत सैय्यद - मस्जिद मे फकत जुम्मन ॥"*

जुम्मन म्हणजे खालच्या तबक्यातील सामान्य लोक व सैय्यद म्हणजे उच्चभ्रू.

* * * * *

**नागपुरांतील हिंदू मुस्लिम संबंधाचा संपूर्ण इतिहास इथे देण्याचे कारण नाही. परंतु इथे प्रयोजनीय मुद्दा हाच आहे की, संपूर्ण देशाची मानसिकता या बाबतीत विपरीत असतांना नागविदर्भात तरी व विशेषत: नागपुरांत तरी अशा विपरीत वातावरणाची धार बोथट करणे आवश्यक आहे, हे डॉक्टरांनी हेरले होते. प्रत्यक्ष संघाची सुरवात निवडक शिशु-बाल-किशोर यांचेवर मुख्यत्वे भर देऊनच व मुळीच गाजावाजा न करता** करावयाची होती. नवीन संस्था स्थापन करण्याची हल्लीची "प्रगतिशील" पद्धति सर्वांना माहीत आहे. १०/१२ लोक चे एका खोलीत एकत्र आले तरी ते एकदम अखिल भारतीय संस्था काढतील, तिची अखिल भारतीय समिति बनवितील, पत्रकार परिषद घेतील, तीत अ.भा. समिती, संस्थेचे नामकरण व घोषणापत्र प्रसिद्ध करुन जगाला सांगतील की, त्यांची नवीन संस्था देशांत, दुनियेंत व ब्रह्मांडात कोणकोणते क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणणार आहे. हिंदूंच्या सद्भाग्याने डॉक्टर "प्रगतिशील" नव्हते "फलानुमेया प्रारंभा:" हीच त्यांची कार्यपद्धती होती. त्यामुळे या सर्व उलाढाल्या करतांना ज्यांचे ज्यांचेशी संपर्क आला त्या सर्वांना आपल्या नवीन उपक्रमांत सामील होण्याचे आवाहन करण्याचा विचारही त्यांच्या मनांत नसेल, याची आपण कल्पना करु शकतो. परंतु बाह्य वातावरणाची प्रतिकूलता फार तीव्र व व्यापक राहणे ही इष्ट नव्हते. नवीन रोपट्याला जनावरांनी खाऊन टाकले असते. तसे होऊ नये याची काळजी आधीच घेणे व त्यासाठी संरक्षक कुंपण (Protective Fencing) आधीच तयार करणे आवश्यक होते. या बाबतीत ज्या शेकडो संपर्कित व्यक्तींचा उपयोग झाला त्या सर्वांचे ही कृतज्ञतापूर्वक स्मरण कोणत्याही आनंदाच्या प्रसंगी डॉक्टरांना अवश्य होत असले पाहिजे.

श्री फडणीसांच्या अभिनंदनाचा प्रसंग या नियमाला अपवाद ठरणे शक्य नव्हते.

* * * * *

आतापर्यंतच्या वृत्तांत सर्वसाधारण सामाजिक वातावरणाच्या कुंपणाचा विचार आला. यात अंतर्भूत असलेले सर्व लोक प्रत्यक्ष कार्याला उपयोगी पडतील अशी अपेक्षा नसते. परंतु त्यांचेही कुंपण म्हणून फार महत्व असते. लेनिनने अशा संपर्कक्षेत्राला समर्पक नाव दिले आहे ते म्हणजे, "a zone of benevolent neutrality" त्याचे महत्वही त्याने सविस्तर वर्णिले आहे. आतापर्यंतचा विचार अशा zone विषयाचा होता.

नागपूर बाहेरही दोन ठिकाणी मोठे दंगे झाले होते. त्यापैकी वाशीमचा तपशील या वेळी हाती नाही. आर्वीला सन १९२५ मध्ये दंगा झाला. त्या निमित्त १४ हिंदू पुढाऱ्यांना अटक झाली. त्यांत डॉक्टरांचे परमस्नेही डॉ. स.नी. मोहरीर व आर्वीजे झुंझार मालगुजार ठाकूर उमरावसिंग बाबासाहेब हे प्रमुख होते. या सर्वांच्या जेलमधील वास्तव्या विषयी व गृहस्थिति विषयी डॉक्टर चिंता करीत. सर्वांची सुटका झाल्यानंतर सर्वांच्या सत्कारा करिता झालेल्या पथसंचलनाला व प्रकट सभेला डॉक्टर आवर्जून उपस्थित होते. या केस करिता श्री दादासाहेब करंदीकर, बॅरिस्टर जोसेफ बॅप्टिस्टा व अलाहाबादचे अल्स्टर या सर्वांना केस घ्यायला प्रवृत्त करण्यांत डॉक्टरांचा प्रमुख हात होता. पुढेही डॉक्टरांनी या सर्वांशी व्यक्तिगत संबंध कायम ठेवले. केस करितां डॉक्टरांचा मुक्काम वर्धा येथे श्री वि.वि. देशपांडे यांचेकडे असे.

इतरत्र ही जिथे जिथे अशी काही भानगड उपस्थित होई तिथे तिथे डॉक्टर स्वत: जातीने पोहचत असत.

हा सर्वसाधारण (General) संपर्क क्षेत्राचा विचार झाला. परंतु तितकाच प्रयास पुरेसा नव्हता. कुंपणाची बांधणी या नात्याने, particularly, विशेष रुपाने विविध संस्थांशी व व्यक्तींशी संबंध वाढविणे आवश्यक होते. त्या दृष्टीने डॉक्टरांच्या कार्याची झेप व आवाका मनाला आश्चर्य चकित करुन सोडणारा होता.

त्या काळांत देशभक्तीचा एक भाग या नात्यांनेच व्यायाम-शाळांना - आखाड्यांना विशेष महत्व प्राप्त झाले होते. नागपूर व्यायामशाळेचे श्री अण्णा खोत व पुढे महाराष्ट्र व्यायामशाळेचे श्री दत्तोपंत मारुळकर यांच्या व्यायामशाळांशी डॉक्टरांचे संबंध होतेच, परंतु त्या शिवाय नागपुरातील सर्वच आखाड्यांशी व्यायामशाळांशी व पहिलवानांशी संपर्क ठेवण्याचाही त्यांचा प्रयत्न असे. तरुणांचे आकर्षण केंद्र असलेल्या संगीताच्या संस्थांशीही

त्याचे निकट संबंध होते. अभिनव संगीत विद्यालय, भारत गायन समाज व चतुर संगीत विद्यालय या त्या संस्था होत. अशा संबंधांतूनच मा. यादवराव जोशी संघाला उपलब्ध झाले, हे सर्वविदित आहे.

गो—सेवक श्री चौंडे महाराज व श्री गोपाळराव भिडे यांची गोरक्षण संस्था, श्री वाडेगांवकर यांचे अंधविद्यालय श्री कृपाशंकर नियोगींचे श्रद्धानंद अनाथालय, श्री गोविंद गणेश चोळकर यांचे "अनाथ विद्यार्थी गृह" श्रीधर नारायण हुद्दार यांची "अभिनव ग्रंथमाला", भोसला वेदशाळा, रामकृष्ण मिशन आश्रम, रायफल असोसिएशन, प्रांतिक क्रीडा समिति, गणेशोत्सव मंडळ्या, युवक मंडळ्या, अभ्यास मंडळे, भजन मंडळ्या (व भोजन मंडळ्याही) वाचनालये व पोहण्याचे वर्ग या सर्व उपक्रमांना डॉक्टर सक्रिय सहाय्य देत असत. जणू या सर्व संस्थाचे ते सक्रिय कार्यकर्तेच होते. या माध्यमातून संपर्कात आलेल्या तरुणांना डॉक्टरांचे मुळे त्याग-तपस्येची प्रेरणा मिळत असे. पुढे सन १९२७ च्या नागपूर दंग्यात शत्रूच्या बंदूकीच्या गोळ्या छातीवर झेलून मरण स्वीकारणारा धुंडिराज लेहगावकर अशाच तरुणांपैकी होता. संपर्क वाढविण्या करिता ते विवाह, उपनयन, सत्यनारायण, नामकरण, शवयात्रा अशा सामाजिक प्रसंगांचाही उपयोग करीत.

सन १९२४ च्या जुलै १२/१३ ला ईद व आषाढी एकादशी एकाच वेळी आली. अर्थात अशा प्रसंगी दंगे होणे अपरिहार्यच होते. त्यावेळी मोहल्ल्या मोहल्ल्यांतून गस्त घालणाऱ्या तरुणांना डॉक्टर वारंवार जाऊन भेटत. दारुच्या गुत्यांवर पिकेटिंग करणाऱ्या निर्भय तरुणांनाही ते अगत्यपूर्वक भेटत. डॉ. ना.सु. हर्डीकर यांनी १९२३ पासून चालविलेल्या "हिन्दुस्थानी सेवादला" चे कार्यकर्ते, संत पाचलेगावकर महाराज यांच्या "मुक्तेश्वर दला" तील युवक व अमरावतीला डॉ. शिवाजीराव पटवर्धन व श्री असनारे यांनी चालविलेल्या "हनुमान व्यायाम शाळे" तील तालीम पटु लोक या सर्वांनाच डॉक्टरांचे विषयी आपुलकी वाटत असे.

संघ स्थापनेच्या पूर्वीपासून व नंतरही कित्येक वर्षे डॉक्टर मराठी मध्यप्रांताच्या कॉंग्रेस मध्ये व हिंदूसभेमध्ये विविध पदांवर राहून काम करीत होते. त्यामुळे मराठी मध्यप्रांतातील या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांशी त्यांचे जवळचे संबंध होते, ही गोष्ट अनेकांना माहित आहे. परंतु एक घटना मात्र लोकांच्या तितकीशी स्मरणात नाही. दि. १२ जुलै १९२२ ला डॉक्टर तुरुंगातून सुटून आल्यानंतर त्यांच्या अभिनंदनासाठी जी प्रकट सभा झाली होती, तीत प्रांतिक पुढाऱ्यांच्या व्यतिरिक्त पं. मोतीलालजी नेहरु व हकीम अजमलखां यांनीही डॉक्टरांच्या अभिनंदनपर भाषणे केली होती. डॉ. ना.भा. खरे अध्यक्षस्थानी होते.

डॉक्टर मधून मधून महात्माजींच्या वर्धा येथील आश्रमांत जात. वर्ध्याच्या "राजस्थान केसरी" साप्ताहिकाचे संपादक श्री रामगोपालजी विद्या-

लंकार हेच बहुधा त्यांचे स्वागत करीत. अशा प्रसंगी डॉक्टरांचे बरोबर बहुधा रामभाऊ पिंगळे, वामनराव घोरपडे, राजाभाऊ डांगरे आदि मंडळी असत. वर्धाश्रमांत त्या काळांत जे.सी. कुमारप्पा, "नई तालीम" ख्यातीचे आर्य नायकम् दंपति, श्री कृष्णादासजी जाजू, किशोरीलाल मश्रूवाला, श्रीमन्नारायण व जानकीदेवी बजाज, दादा धर्माधिकारी, आचार्य भणसाली अशी नामवंत मंडळी असत.

वर्ध्यालाच श्री राळेगणकर यांच्या जागेत गंगाप्रसादजींच्या नेतृत्वाखाली पूर्व क्रांतिकारकांच्या पुनर्वसनाच्या उद्देशाने डॉक्टरांच्या योजनेप्रमाणे चालणाऱ्या "राष्ट्रीय मल्ल विद्या शाळा" या संस्थांना भेट देण्याकरिता डॉक्टर एकटेच जात. या संस्थेत पंजाबकडील १०/१२ व त्या वेळच्या मध्यप्रदेशातील १२/१३ पूर्व क्रांतिकारी तरुण असत.

"स्वातंत्र्य" दैनिक चालवितांना श्री वासुदेवराव फडणवीस, श्री अच्युत बळवंत कोल्हटकर, डॉ. शं.दा. पेंडसे यांचेशी डॉक्टरांचा दृढ संबंध आला होता व तो शेवटपर्यंत टिकलाही.

काँग्रेसने निवडणुकांच्या राजकारणांत रुचि घेण्यापूर्वी या मराठी भागांतील जातिवादी, अवांछनीय तत्वांना निवडणुकांच्या क्षेत्रांत विरोध करण्याचे काम "राष्ट्रीय पक्षा"ने केले. त्या पक्षाचे प्रमुख पुढारी म्हणजे बॅरिस्टर रामराव देशमुख, बाबासाहेब खापर्डे, वर्ध्याचे मनोहरपंत देशपांडे व गोविंदराव चरडे, येळीकेळीचे डॉ. धोपटे, हिंगणघाटचे नागले वकील व चंद्रपूरचे बळवंतराव देशमुख या मंडळींचाही उपयोग Fencing म्हणून स्वाभाविकपणेच झाला.

नागपूरच्या बार असोसिएशनच्या बऱ्याच सदस्यांनीही हीच भूमिका पार पाडली. अधिवक्ता बाबाजी पाध्ये, भैय्यासाहेब बोबडे, बळवंतराव मंडलेकर व गोपाळराव देव यांचा ग्रुप तर या दृष्टीने प्रसिद्धच होता. दादासाहेब शेवडे, दा.तु. मंगळमूर्ति या श्रेणीत होते. दत्तोपंत देशपांडे, बाबूराव कान्हे आदि वकीलांचा अलग उल्लेख करण्याची आवश्यकता नाही.

असेच कुंपणाचे काम कांही संत पुरुषांच्या आशीर्वादानेही झाले. "गोमंतक शुद्धि" आंदोलनाचे प्रवर्तक श्री विनायक महाराज मसूरकर, संत पाचलेगावकर, मोझरीचे राष्ट्र संत तुकडोजी महाराज, स्वामी सत्यदेव, गोभक्त चौंडे महाराज, स्वामी शिवानंद, शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी आणि श्रीमंत शाहू छत्रपतींनी निर्मिलेल्या पीठाचे क्षात्रजगद्गुरु हे संत आपापल्या कार्याने जे वातावरण निर्माण करीत त्यामुळेही संघ कार्याला अनुकुल मानसिकता निर्माण व्हायला मदत होत असे.

संघातील शारीरिक कार्यक्रमांचे प्रवर्तक अण्णा सोहोनी यांचे नाव सर्व जाणतात. परंतु शारीरीक शिक्षणाचे त्यांचे गुरुदेव श्री दामोदर

बळवंत उपाख्य "भिडे भटजीचे" नाव कुणी जाणत नाही. ते श्रेष्ठ क्रांतिकारक होते. त्यांनीच सेनापति बापट यांना क्रांतीची दीक्षा दिली होती. संघातील शारीरिक शिक्षणाचा मूळ स्त्रोत असे त्यांना म्हणता येईल.

आता हे ऐकून कुणालाही आश्चर्य वाटेल की, संघाचा घोष विभाग निर्माण होण्याच्या कामांत बरेचसे श्रेय श्रीमंत दाजीसाहेब बुटी यांचे कडे जाते. मात्र हे काम त्यांनी जाणूनबुजून केले नाही. चातुर्मासांत त्यांच्या वाड्यांत भोजनावळी होत असत व भोजन करणाऱ्या प्रत्येक माणसाला दक्षिणा म्हणून ४ आणे देण्याची प्रथा असे. संघांत प्रथम बिगुल खरीदण्याची कल्पना आली. परंतु त्याला आवश्यक पैसा संघाजवळ नव्हता. घोषांतील इतर वाद्य खरेदी करण्याकरिता पैशांची आवश्यकता होती. त्यावेळी योजना ठरली की, जास्तीत जास्त स्वयंसेवकांनी तिथे जेवणाकरिता यावे, ४ आणे दक्षिणा घ्यावी व ती संघाच्या कोशांत घोषाकरिता म्हणून अलग जमा करावी. घोष विभागाचा प्रारंभ या प्रकारांतून झाला.

नियमित पूर्ण घोषाची रचना प्रथम १९२९ मधे झाली. घोषाचे शिक्षण देण्याचे काम सैनिकी सेवेतून निवृत्त अशा एक ख्रिश्चन वादनपटूने केले. त्याचे नाव उपलब्ध नाही. त्याची सेवा संघाला उपलब्ध करून देणारे श्री व्हिव्हियन बोस व बॅरिस्टर गोविंदराव देशमुख हे दोघेजण होते. ज्यांच्या मध्यस्थीने हा ख्रिश्चन वादनपटू संघाला मिळाला.

ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांना फारशी प्रसिद्धी प्राप्त झाली नव्हती तेव्हा त्यांचे नाव डॉक्टरांच्या संपर्क-सूचीत सामील झाले होते. त्याला कारणही तसेच होते. त्यांच्या एका विधानाने समकालीन विचारवंतांत बराच काळ पर्यंत चर्चा निर्माण झाली होती. पटवर्धन मैदानावरील एका सभेंत ते म्हणाले होते की, आता देशकार्य करण्याकरिता भगवी वस्त्रे धारण न करता, सर्व सामान्य लोकांप्रमाणे राहणी ठेवून, संन्याशाच्या वृत्तीने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे.

कुंपणाच्या बांधणीच्या कामाचा एक भाग म्हणून पश्चिम महाराष्ट्रांत गेल्यानंतर तिकडील लोकशाही स्वराज्य पक्षाचे श्री नरसिंह चिंतामण केळकर आदि मंडळी व हिंदुसभेचे सर्व पुढारी यांच्या "देवदर्शना" करिता जाण्याचा नित्यक्रम डॉक्टरांनी शेवटपर्यंत चालू ठेवला होता. त्या काळांत हिंदुत्वाचा उद्घोष करणे फार साहसाचे काम होते. लाला हरदयाल, स्वामी श्रद्धानंद, भाई परमानंद, स्वामी सत्यदेव यांनी साहसपूर्वक हे काम चालविल्यामुळे सर्वच हिंदुत्वनिष्ठांच्या मनांत त्यांचेविषयी कृतज्ञतेची भावना होती. हिंदुत्वनिष्ठ सर्व पुढाऱ्यांचा आशीर्वाद संघाला मिळावा अशी खटपट डॉक्टर नेहमी करीत. पं. मदनमोहन मालवीय, बाबू पद्मराजजी जैन, सर गोकुलचंद नारंग, सावरकर बंधु, श्री वरदराजलू नायडू या मंडळींचे सहकार्य डॉक्टरांनी संघाकरिता प्राप्त करुन घेतले होते. बॅ. जयकर, प्रताप सेठ, डॉ. श्रीधर

व्यंकटेश केतकर आदि मंडळींची सक्रिय सहानुभूतिही संघाला प्राप्त झाली होती. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे विषयी वेगळे लिहिण्याची आवश्यकता नाही.

नागपूरच्या स्तरावरही द्विंडी सत्याग्रहांतील पुढाऱ्यां व्यतिरिक्त परावर्तनपटु जगन्नाथ प्रसाद वर्मा, भर सभेत हिंदुविरोधी वक्त्याचे धोतर हिसकावून घेऊन त्याला नग्नावस्थेत सभेबाहेर पाठविणारे बिंदुमाधव पुराणिक, डॉ. मुंजे यांचे मोठे चित्र गेंड्यांच्या प्रमाणे तयार करुन त्याची मिरवणूक काढणाऱ्या प्रचंड गर्दीत हिंमतीने शिरुन ते चित्र फाडणारे उत्साही कार्यकर्ते, अशा सर्वप्रकारच्या लोकांशी डॉक्टर संबंध राखून असत.

या विभागांतील मालगुजार लोकांनी आपले एक मंडळ तयार केले होते. त्याला ते गंमतीने "नरेन्द्र मंडळ" असे म्हणत. समीउल्लाखानही त्यात सदस्य होते. या "नरेन्द्र मंडळा" चे सर्व लोक डॉक्टरांचे घनिष्ट मित्र होते.

* * * * *

तसे पाहिले तर डॉक्टरांचे संबंधाविषयी पूर्ण माहिती गोळा करणे अशक्यच आहे. एकतर त्यांचा स्वभावच मुळी आत्मविलोपी होता. स्वत: केलेल्या कामाचे श्रेयही ते इतरांना देत. स्वत: विषयी कधीही काहीही सांगत नसत. शिवाय "काम करण्यासाठी असते, त्याची वाच्यता करण्यासाठी नव्हे" हे त्यांचे सूत्र असे. त्यांतही क्रांतिकार्यात जी अनेक वर्षे त्यांनी घालविलीत त्यांच्या संस्कारामुळे त्यांची मुळची आत्मविलोपी वृत्ति अधिकच प्रबळ होणे स्वाभाविक होते. म.म. बाळशास्त्री हरदास यांना कांही लोकांनी विनंती केली की, त्यांनी भारतीय क्रांतिकारकांचा इतिहास लिहावा. त्यावेळी त्यांची प्रतिक्रिया अशी होती की, ही मागणी परस्पर विसंगत आहे. कारण इतिहास लेखनाची पहिली आवश्यकता ही आहे की, संबंधित विषयाची संपूर्ण समग्र माहिती प्रथम गोळा करणे व क्रान्तिकार्याची पहिली अपरिहार्यता ही असते की, कार्यातील प्रत्येक हालचाल पूर्णपणे गुप्त ठेवण्यात यावी. या वातावरणांत तयार झालेल्या महापुरुषांचे जीवन (iceberg) हिमशैलाप्रमाणे ७/८ समुद्रसपाटीच्या खाली असलेले, जनतेच्या दृष्टीला न पडणारे असावे व केवळ वरच्या १/८ भागावरुनच त्याच्या कर्तृत्वाविषयी मूल्यांकन करण्याची पाळी इतरांवर यावी हे स्वाभाविक आहे.

## कृतज्ञतापूर्वक अभिवादन

प्रत्यक्ष संघस्वयंसेवक व समर्थक यांच्या वर्तुळा बाहेर डॉक्टरांचे कुणाशी, किती पक्ष-निरपेक्ष संबंध होते याची पूर्ण माहिती आजच्या पिढिला असणे संभवनीय नाही. बॅरि. मोरुभाऊ अभ्यंकर यांच्या मनांत डॉक्टरांच्या

विषयी कोणत्या भावना होत्या हे दर्शविणारी घटना सर्वपरिचित आहे. जनरल मंचरशा आवारी यांचेशी ही डॉक्टरांचे फार जवळचे संबंध होते. त्यांच्या शस्त्र सत्याग्रहाचे वेळी डॉक्टरांनी त्यांना ही मूल्यवान सूचना केली होती की, सत्याग्रहाला जाणरांच्या हाती खरी शस्त्रे देऊ नका, कारण त्यामुळे आपल्या संग्रहांतील खरी शस्त्रे सरकारच्या हाती जातात. त्या ऐवजी पत्र्यांच्या तलवारी त्यांच्या हाती द्या. आवारींनी डॉक्टरांची ही सूचना अंमलातही आणली होती. १९४८ मध्ये संघाविषयी सार्वत्रिक गैरसमज पसरविण्यात आला, त्याचा थोडा काळ आवारी वरही परिणाम झाला. परंतु गैरसमज दूर झाल्यानंतर त्यांची संघाविषयीची दृष्टि निवळली व प.पू. श्री गुरुजींच्या घरी जाणे येणे ही त्यांनी सुरु केले. फॉर्वर्ड ब्लॉकचे मजूर पुढारी श्री रामभाऊ रुईकर यांचेशी असलेले डॉक्टरांचे जिव्हाळ्याचे संबंध सर्वांच्या ध्यानांत आहेत. परंतु मीरत कटातील कम्युनिस्ट पुढारी, जे कम्युनिस्टांनी सन १९२४ मध्ये मुंबईच्या अधिवेशनांत AITUC काबीज केली त्यावेळी AITUC चे सर्वप्रथम कम्युनिस्ट अध्यक्ष म्हणून निवडले गेले होते ते श्री धुंडिराज पंत टेंगडी यांचेशी असलेले संबंध तितकेसे प्रसिद्ध नाहीत. कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते असूनही ते डॉक्टरांच्या कामावर प्रसन्न असत. ते म्हणत- "केशवा, तू तुझ्या संघाच्या गणवेशधारी १०,००० स्वयंसेवकांचे पथसंचलन मुंबईला करुन दाखव. मी तुला दहा लाख रुपये गोळा करुन देईन."

आजच्या पिढीचे लोक, श्री वामनराव घोरपडे यांना कॉंग्रेसजन असूनही ब्राम्हणेतर पक्षाचे एक पुढारी या नात्यानेच ओळखतात. त्यांना या गोष्टीची कल्पना नाही की, श्री घोरपडे यांचेशी डॉक्टरांचे निकटचे संबंध होते व डॉक्टरांच्या विविध कार्यात ते सहभागीही होते. अमरावतीचे श्री नानासाहेब गवई कट्टर हिंदुत्वनिष्ठ होते व त्यामुळे त्यांच्या हे स्मरणात ही राहत नसे की ते तथाकथित अस्पृश्य जातीचे आहेत. डॉक्टरांचे ते प्रबल समर्थक होते.

मध्य प्रांत विधिमंडळाच्या मार्च १९३४ च्या अधिवेशनांत संघाला पाठिंबा देण्याकरिता जे निरनिराळे सदस्य बोलले त्याची नावे ऐकून समकालीनांनाही आश्चर्य वाटले. सिहानेव्याचे श्री कांशीप्रसाद पांडे व श्री बाबासाहेब कोलते यांच्या cut motion वर बोलणारे अधिवक्ता श्री तु.ज. केदार, सौ. रमाबाई तांबे, बाबासाहेब खापर्डे, उमेदसिंग ठाकूर, मंगळमूर्ति, सी.बी. पारख, रहमान व फुले होते. या वेळी विधि मंडळांत झालेल्या प्रश्नोत्तरांचे वर्णन वर आलेलेच आहे.

## तत्कालीन वातावरण

प्रत्यक्ष संघाच्या व संघसृष्टीतील विविध क्षेत्रांच्या कार्यांतील प्रमुख कार्यकर्त्यांची नावे आजच्या पीढीतील स्वयंसेवकांना माहीत आहेत.

डॉक्टरांनी स्वत: सूचित न करतांही केवळ त्यांच्या जीवनाच्या उदाहरणावरुन प्रेरणा घेउन आपापले जीवन संघकार्याला पूर्णपणे समर्पण करुन "प्रचारक" पद्धतीचा पाया घालणारे, नागविदर्भाच्या बाहेरील प्रांतांत संघकार्याचा प्रारंभ व्हावा या हेतूने डॉक्टरांनी उच्च शिक्षणाच्या निमित्ताने ज्यांना परप्रांतांत पाठविले असे तरुण विद्यार्थी, "प्रचारक" या नात्यानेच विविध प्रांतांत जाऊन तेथे संघकार्याचे बीजारोपण व जोपासना करणारे कार्यकर्ते, त्यांचेपासून प्रेरणा घेऊन आपापल्या क्षेत्रांत संघकार्याला वाहून घेणारे स्थानीय व प्रादेशिक स्तरांवरील लोक, भारताबाहेर अन्यान्यदेशांत, निरनिराळ्या स्वरुपांत संघकार्याची मुहूर्तमेढ रोवणारे साहसी स्वयंसेवक, तीनही संघबंदीच्या कालखंडांत सत्याग्रह करणारे, जेलमध्ये जाणारे व जेल बाहेर भूमिगत राहून प्रतिकार संघटित करणारे असंख्य स्वयंसेवक, कारावासांत स्वयंसेवकांच्या संपर्कात आलेले गैर स्वयंसेवक सज्जन, राष्ट्रजीवनाच्या विविध क्षेत्रांत व्यक्तिगत रुपाने प्रवेश करुन तेथे संघसिद्धान्तांच्या प्रकाशात उपयुक्त कार्याची रचना व विचारांचा विकास करणारे कार्यकर्ते, अशा सर्वा विषयी प्रत्यक्षत: किंवा अप्रत्यक्षत: तपशीलवार किंवा स्थूलमानाने, कांहीना कांही माहिती आजच्या स्वयंसेवकांना असते. परंतु आजच्या स्वयंसेवकांना १९४७ नंतरच्या देशांतील वातावरणाचाच केवळ अनुभव असल्यामुळे सन १९३७ पूर्वीच्या देशांतील सार्वजनिक-राजकीय क्षेत्रांतील मानसिक वातावरणाचा त्यांना परिचय नसतो व त्यामुळे त्या काळांत संघ कार्याची वाढ कोणत्या पद्धतीने झाली असेल व एकदा जीवनाचे ध्येय निश्चित केल्यानंतर त्या दिशेने पुढे जाण्याकरिता डॉक्टरांना काय काय करावे लागले असेल व कुणाकुणाशी संबंध प्रस्थापित करावे लागलें असतील, या विषयी कल्पना करणे आजच्या स्वयंसेवकांना अशक्यप्राय आहे.

सन १९२५ च्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर संघाची स्थापना झाली. संघ वाढत गेला, वाढत आहे व सर्व विरोधांना तोंड देऊन पुढेही वाढत राहणार यात शंका नाही. हे सर्व होत असतांना जे जे संघाचे पदाधिकारी म्हणून राहिले, ज्यांनी ज्यांनी प्रचारक विस्तारक या भूमिकेत राहून कार्यवृद्धीला मदत केली. त्या सर्वांचे विषयी कांहीना काही माहिती आजच्या पीढीला आहे. परंतु पायाभरणीच्या कालखंडात, "असु आम्ही सुखाने पत्थर पायातील" या विशुद्ध भावनेने, ध्येय समर्पित चित्ताने, ज्यांनी सर्व संकटांचा मुकाबला करुन संघ कार्याची मुहूर्तमेढ रोविली त्या सर्वांची नांवे आज लोकांच्या स्मरणांत नाहीत. तसेच त्या प्रारंभिक काळांत ज्यांनी मूल्यवान सहाय्य केले व एकदा काम व्यवस्थित सुरु झाल्यानंतर जे पुढे निष्क्रिय झाले त्याचेही योगदान फार महत्वाचे मानले पाहिजे. अर्थात हे पायांतील पहिले दगड विदर्भ प्रांतातीलच होते हे स्वाभाविक आहे. सुदैवाने त्या सर्वांची संकलित नावे पूजनीय अप्पाजी जोशी यांनी उपलब्ध करुन

दिली आहेत. ती खालील प्रमाणे.

वीर वामनराव जोशी, श्री बळवंतराव दाणी, अडेगावचे श्री शंकररांव भगत आदि । भंडाऱ्याचे डॉ. व्यवहारे, श्री गणपतराव देव, चंद्रपूरचे नानासाहेब भागवत, डॉ. तेलंग, श्री बाबाजी वेखंडे, श्री देवराव पाटील (वरोडा), वणीचे श्री लाटूजी पाटील, श्री अण्णाजी देशमुख, श्री आबाजी भेदी, डॉ. यादवराव अणे, यवतमाळचे वामनराव धर्माधिकारी, अमृतराव साकळे आदि । अमरावतीचे डॉ. सोमण, श्री बामणगांवकर, अकोल्याचे श्री गोपाळराव चितळे, श्री. मामा जोगळेकर व श्री रामधन.

नागपूरचे अप्पाजी गांधी, रामभाऊ गोखले, बढे, बुवा उपाध्ये, बाबूराव उळाभाजे, राजाभाऊ डांगरे, अप्पाजी तिजारे, वामनराव घोरपडे, रामभाऊ पिंगळे, दत्तोपंत परांजपे, मोहोप्याचे अप्पासाहेब हळदे, खाप्याचे श्री आनंदराव गाडगे, सावनेरचे श्री प्रभाकरपंत हरकरे, काटोलचे डॉ. पाचखेडे, श्री बळवंतराव पाचखेडे, भाऊसाहेब घाटे, श्री मुलमुले, रामटेकचे श्री अण्णाजी जोशी, उमरखेडचे तात्याची वान्नेरे, वर्धेचे मनोहरपंत देशपांडे, गोविंदराव पांडे, गोविंदराव चरडे, त्रिंबकराव (टी.पी.) देशपांडे, व्यंकटेश (वी.वी.) देशपांडे, डॉ. धोपटे (येळीकेळी), नानाजी देशमुख (पवनार), गणपतराव जोशी, तात्याजी उपदेव, (सेलू) दादासाहेब सुभेदार, मुरलीधर लाला कक्कड (हिंगणी), बाजीराव अमृतराव कोटंबकर (कोटंबा), लक्ष्मणराव व भगवानराव गोल्हर (देवळी), त्र्यंबकराव देशपांडे (सालोड फकीर), भालेराव देशमुख (तळेगाव), अंबादासपंत काळे, भाऊजी पुराणिक (नाचणगांव), बाबासाहेब देशपांडे, नानासाहेब टालाटुले (सिंदी), विश्वनाथराव उंबरकर (उत्तमपूर), बापूजी अगस्ति, नारायण गोपाळ देशपांडे, डॉ. मोहरील, डॉ. दे.र. (अण्णा) देशपांडे, आनंदराव अंबाडे (आर्वी), श्यामराव देशपांडे (आष्टी), गोविंदराव देशमुख (कारंजा), बाबाजी उन्दरे (तिरोडा), महादेवराव देशमुख (वाढोणा).

एका संस्कृत साहित्यिकाने (मालाकाराला) माळ्याला म्हटले आहे की, पावसाळा सुरु होऊन दररोज धोधो वृष्टी होत असतानां तू वृक्षाला जे शंभर घडे पाणी देतो आहेस त्याचे महत्व त्या वृक्षाच्या दृष्टीने तितके नाही, जितके उन्हाळ्यांत सर्व वृक्ष जडमूळासहित सुकून जात असतांना कुणीतरी दररोज त्या वृक्षाला घातलेल्या एक घडा पाण्याचे आहे. असेच महत्व वरील मंडळींचे आहे. परमपूजनीय डॉक्टरांचे बरोबरच आपण सर्व स्वयंसेवक अशा आनंदाच्या क्षणी या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करु या व त्यांना विनम्र प्रणाम करु या.

* * * * *